


सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com

Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २९८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. १ जानेवारी २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## भाजपचा विजयरथ सुसाट! मतदानाआधीच धुळे महापालिकेत पारडं झालं जड

### पक्षाची बिनविरोध विजयाची घोडदौड सातत्याने सुरूच



**विदर्भ प्रजसत्ताक दि.१धुळे**

धुळे महानगरपालिका निवडणुकीच्या रिंगणात भारतीय जनता पक्षाने आपली पकड अधिक मजबूत केली असून, पक्षाची बिनविरोध विजयाची घोडदौड सातत्याने सुरूच आहे, उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या पहिल्याच दिवशी प्रभाग क्रमांक १७ 'ब' मधील भाजपच्या अधिकृत उमेदवार सुरेखा चंद्रकांत उगले यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्यांच्या विरोधात रिंगणात असलेल्या दोन अपक्ष उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतल्याने उगले यांचा विजय सुकर झाला आहे.

भाजप आमदार अनुप अग्रवाल यांनी काल पहिला उमेदवार बिनविरोध झाल्यानंतर आगे आगे देखो होता है क्या असे सूचक वक्तव्य केल होतं. त्याप्रमाणे सलग दुसऱ्या दिवशी धुळ्यात भाजपचे तिसरे उमेदवार बिनविरोध झाले आहे. निवडणुकीच्या प्रत्यक्ष मतदानापूर्वीच भाजपने मिळवलेले हे यश विरोधकांसाठी मोठा धक्का मानले जात असून, शहराच्या राजकीय वर्तुळात या विजयाची जोरदार चर्चा रंगली आहे.

अर्ज दाखल करून २४ तासांत धुळे महानगरपालिका निवडणुकीमध्ये भाजपचे दोन नगरसेवक बिनविरोध निवड झाले होते आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे हे दोन्ही बिनविरोध झालेले नगरसेवक हे दुसऱ्या पक्षातून भाजपात आयत करण्यात आले होते. काही दिवसांपूर्वीच या दोन्ही नगरसेवकांचा दुसऱ्या पक्षातून भाजपमध्ये पक्षप्रवेश झाला होता आणि हे दोन्ही बिनविरोध झालेले नगरसेवक या महिला आहेत.

धुळे महानगरपालिका काबीज करण्यासाठी भाजपतर्फे मोठ्या प्रमाणात आयात उमेदवारांना संधी देण्यात आली आणि या दरम्यान जवळपास विद्यमान ३२ नगरसेवकांना तिकीट नाकारण्यात आलं आणि त्यांच्या जागी दुसऱ्या उमेदवारांना भाजपतर्फे उमेदवारी देखील देण्यात आली. यामध्ये बहुतांश उमेदवार हे दुसऱ्या पक्षातून आयात केलेले आहेत.

अशातच आज पुन्हा आणखी एक नगरसेवक बिनविरोध निवडणून आल्याने भाजपचा विजयाचा रथ सुसाट धावत असल्याचे दिसून येत आहे. कल्याण-डोंबिवली, पनवेल आणि आता धुळे या महापालिकांमध्ये भाजपने खाते उघडले असून मतदानाआधीच विजयाचा गुलाल उधळला आहे.

## शिंदे गटाने जळगाव महापालिकेत उघडलं खातं; ठाकरेंच्या उमेदवाराची माघार

### आणखी ४ बिनविरोध होणार, शिवसेना नेत्याचा दावा



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१जळगाव**

जळगाव महापालिकेच्या निवडणुकीसाठी माघारीची प्रक्रिया सुरू झालीय. अर्ज छाननी प्रक्रियेदरम्यान प्रतिस्पर्धी उमेदवाराचा अर्ज बाद झाल्यानंतर भाजपच्या उज्ज्वला बेंडाळे या बिनविरोध विजयी झाल्या. भाजपनंतर आता शिवसेनेनेही खातं उघडलंय. शिंदेसेनेचे आमदार प्राध्यापक चंद्रकांत सोनवणे यांचे पुत्र गौरव सोनवणे हे बिनविरोध विजयी झालेत.

दरम्यान त्यांच्या विजयाची अधिकृत घोषणा अर्ज माघारी घेण्याचा कालावधी संपल्यानंतर होणार आहे. भाजपच्या माजी महानगराध्यक्षा उज्ज्वला मोहन बेंडाळे यांच्या विरोधात एकही अर्ज नसल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली होती. त्यामुळे भाजपने महापालिकेत खाते उघडले होते. आता प्रभाग १८ अ मधून शिंदेसेनेनेही महापालिकेत धमाकेदार एंट्री केलीय.

प्रभाग क्रमांक १८-अ मधून गौरव चंद्रकांत सोनवणे यांना शिंदेसेनेनेकडून उमेदवारी देण्यात आली होती. त्यांच्या विरोधात ठाकरे गटाकडून मयूर चंद्रशेखर सोनवणे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. मात्र ऐनवेळी माघार घेतलं. शिवसेनेच्या विजयानंतर शिंदे सेनेचे आमदार आणि मंत्री गुलाबराव पाटील यांनी गौरव सोनवणे यांचं अभिनंदन केलं. त्यावेळी त्यांनी ठाकरे गटाच्या उमेदवाराला टोमणा मारला.

शिवसेनेचा एक उमेदवार बिनविरोध झाला आहे तर काल भाजपचा एक उमेदवार बिनविरोध झाला होता. ठाकरे गटाच्या उमेदवाराने का माघार घेतली माहित नाही, पण कदाचित विकासाला पाहून त्यांनी माघार घेतली असावी. सध्या जास्तीत जास्त उमेदवार बिनविरोध करण्याचे मिशन असून संध्याकाळपर्यंत आणखी चार उमेदवार बिनविरोध होतील, असा विश्वास मंत्री गुलाबराव पाटील यांनी व्यक्त केलाय. जळगाव महापालिकेत महायुती बहुमताचा आकडा पार करेल, असा विश्वास देखील मंत्री गुलाबराव पाटील यांनी व्यक्त केला आहे.

## अजित पवारांच्या राष्ट्रवादीने खातं उघडलं; अहिल्यानगरमधून पहिला उमेदवार बिनविरोध





**विदर्भ प्रजासत्ताक दि.१अहिल्यानगर**

पश्चिम महाराष्ट्रातील महत्त्वाच्या म्हणून लक्ष लागलेल्या अहिल्यानगर महापालिकेच्या ६८ जागांसाठी एकूण ७८८ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. बुधवारी विविध निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांसमोर अर्जांची छाननी प्रक्रिया पार पडली. या प्रक्रियेत एकूण १७अर्ज अवैध ठरवून बाद करण्यात आले आहेत, मुख्य निवडणूक अधिकारी तथा महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी याबाबत माहिती दिली.

विशेष म्हणजे बाद झालेल्या अर्जांमध्ये शिवसेना शिंदे गटाच्या ५ उमेदवारांचे अर्ज बाद झाल्याने शिवसेनेला मोठा धक्का बसला आहे. तर, अजित पवारांच्या राष्ट्रवादीने अहिल्यानगरमधून विजयाचा खातं उघडलं. येथील राष्ट्रवादीचे कुमार वाकळे बिनविरोध निवड झाले आहेत.

अहिल्यानगर मनपा निवडणुकीत राष्ट्रवादी अजित पवार यांच्या पक्षाने खाते उघडले असून राष्ट्रवादीचे कुमार वाकळे यांची प्रभाग क्र.८ ड मधून बिनविरोध निवड झाली आहे. कुमार वाकळे यांच्या विरोधात अपक्ष उमेदवार पोपट कोलते यांचा एकमेव अर्ज वैध झाला होता. मात्र, आज पोपट कोलते यांनी उमेदवारी अर्ज माघारी घेतल्याने कुमार वाकळे यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्यामुळे, आत्तापर्यंत राज्यात ८ उमेदवार बिनविरोध निवड झाले आहेत. त्यामध्ये, भाजपच्या ६, एकनाथ शिंदेंअहिल्यानगर महानगरपालिका निवडणुकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला मोठा धक्का बसला आहे. सर्वाधिक म्हणजेच ५४ उमेदवारी अर्ज दाखल करणाऱ्या शिंदेसेनेच्या पाच उमेदवारांचे अर्ज छाननीअंती अवैध ठरवण्यात आले आहेत. त्यामुळे निवडणूक रणांगणात शिंदेसेनेचे उमेदवार आता ४९ वर आले असून, हा पक्षासाठी निवडणुकीपूर्वीच मोठा झटका मानला जात आहे.च्या १ आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या एका उमेदवाराचा समावेश आहे.

## ठाकरे बंधूंचा वचननामा ४ जानेवारीला प्रसिद्ध होणार



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१मुंबई**


मुंबईतील मराठी माणसांचा मुद्दा हाती घेत एकत्र आलेल्या राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या मनसे आणि उद्धवसेना या पक्षांची मुंबई महानगपालिका निवडणुकीसाठीची जागावाटपाची प्रक्रिया बऱ्यापैकी सुरळीतपणे पार पडली आहे. जागावाटप करून करून उमेदवार निश्चित केल्यानंतर आता ठाकरे बंधूंकडून मुंबईकरांना दिला जाणारा वचननामा आणि सभांच्या नियोजनाकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. दरम्यान, ठाकरे बंधूंच्या उद्धवसेना आणि मनसे या पक्षांचा वचननामा ४ जानेवारी रोजी प्रसिद्ध होणार असून, त्यानंतर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या संयुक्त सभा मुंबई महानगरपालिका आणि एमएमआरमधील महानगरपालिकांच्या क्षेत्रात होणार आहेत, अशी माहिती उद्धवसेनेचे खासदार आणि प्रवक्ते संजय राऊत यांनी दिली आहे.

आज सकाळी प्रसारमाध्यमांशी बोलताना संजय राऊत यांनी सांगितले की, ठाकरे बंधूंच्या युतीचा वचननामा ४ जानेवारी रोजी प्रसिद्ध होणार आहे. या वचननाम्यावर शेवटचा हात फिरवण्याचं काम दोन्ही बाजूंनी सुरू आहे. त्यानंतर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या संयुक्तसभा मुंबईसह एमएमआर परिसरात होतील. पूर्व आणि पश्चिम उपनगरांमध्ये संयुक्त सभा होतील. त्यानंतर शिवतीर्थावर संयुक्त सभा होईल. त्यानंतर मीरा-भाईंदरमध्ये सभा होईल, ठाण्यामध्ये सभा होईल, कल्याण आणि डोंबिवली अशा दोन सभा होतील. तसेच नाशिक येथेही संयुक्त सभा होणार आहे, अशी माहिती संजय राऊत यांनी दिली.उद्धव सेना आणि मनसेचा वचननामा हा एकत्रित असणार आहे. तसेच आदित्य ठाकरे आणि अमित ठाकरे हे या वचननाम्यावर काम करत आहेत, असेही संजय राऊत यांनी सांगितले.

## मुंबईकरांना वीज, पाणी, शिक्षण, आरोग्य सेवा मोफत 'आप'ने दिली गॅरंटी, जाहीरनामा केला प्रसिद्ध

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१ मुंबई**

दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचा आम आदमी पक्ष मुंबई महानगरपालिका निवडणूक लढवत आहे. सुमारे ७५ जागांवर आम आदमी पक्षाने उमेदवार दिले आहेत. मुंबईकरांना २४ तास मोफत पाणी, मोफत वीज, शिक्षण आणि आरोग्य सेवा मोफत देण्याचे आश्वासन आप पक्षाकडून देण्यात आहे. माजी मुख्यमंत्री आणि आप नेत्या आतिशी यांनी मुंबईतील विकासावर बोलताना सत्ताधाऱ्यांवर टीका केली.



आम आदमी पक्षाने मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी जाहीरनामा नुकताच प्रसिद्ध केला. दिल्ली आणि पंजाबमधील यशस्वी प्रशासन मॉडेलवर आधारित पाणी, शिक्षण, वीज आणि दवाखाना या चार गोष्टी मुंबईकरांना मोफत देण्याचे आश्वासन 'केजरीवालची गॅरंटी' या अंतर्गत 'आप'ने जाहिरनाम्यामध्ये दिले आहे. अफाट संपत्ती असूनही मुंबई शहरीकरण एक विद्रूप, अस्वच्छ आणि असुरक्षित बनले आहे. योग्य नियोजन केले, तर मुंबई जगासाठी एक आदर्श बनू शकते. ७५ हजार कोटी रुपयांहून अधिक अर्थसंकल्प असलेल्या या पालिकेने केवळ निकृष्ट सेवा दिल्या आहेत. बांधकाम क्षेत्रातील नफा लाटण्यासाठी पालिकेच्या शाळा जाणीवपूर्वक बंद केल्या जात आहेत, अशी टीका आतिशी यांनी केली.

## वंचितकडून मुंबईत काँग्रेसचा गेम, १६ जागांवर उमेदवारच नाही; नक्की कुणाशी सेटिंग?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१ मुंबई**

मुंबई महापालिका निवडणुकांमध्ये सर्वांचे लक्ष मुंबई महापालिकेच्या निवडणुकीकडे लागले आहे. त्यासाठी मुंबईत युती-आघाड्यांचे वेगवेगळी समिकरणे बनली. मात्र, अर्ज दाखल झाल्यानंतर अनेक गोंधळ समोर येत आहेत. यात मुंबईतील १६ जागांवर वंचित बहुजन आघाडीने उमेदवार न दिल्याने वेगळीच चर्चा सुरू झाली आहे. काँग्रेस-वंचित बहुजन आघाडीच्या बैठकीत वंचितने ६२ जागा घेतल्या होत्या. मग अचानक १६ जागांवर उमेदवार न देण्याचे कारण काय, हे अजून स्पष्ट झालेले नाही. मात्र, यातून सेटिंगचा वास येत असल्याची चर्चा काँग्रेसकडून केली जात आहे.



मुंबई महापालिकेसाठी काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी आणि महादेव जानकर यांच्या राष्ट्रीय समाज पार्टी यांच्यात आघाडी झाली आहे. तिन्ही पक्षांनी अनेक चर्चांनंतर जागावाटपावर सहमती दर्शवली. यात काँग्रेसला १५५, वंचित बहुजन आघाडीला ६२ आणि राष्ट्रीय समाज पार्टीला (रासप) १० जागा मिळाल्या. काल (३० डिसेंबर) उमेदवारी अर्ज भरले तेव्हा वंचितने त्यांच्याकडील २१ जागा आयत्यावेळी काँग्रेसला परत केल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे काँग्रेसच्या नियोजनाचा विचका झालाच शिवाय कार्यकर्त्यांमध्येही चुकीचा मेसेज गेला.

वंचित बहुजन आघाडीने चर्चा करून मुंबईत ६२ जागा घेतल्या तर त्यांनी उमेदवार उभे करणे गरजेचे होते. आयत्यावेळी उमेदवार नाहीत, हे कारण देत त्यांनी २१ जागा काँग्रेसला परत केल्या. ऐनवेळी काँग्रेसने ५ जागांवर त्यांचे उमेदवार दिले. मात्र, १६ जागांवर ना दोन्ही पक्षांकडून उमेदवार देण्यात आलेले नाहीत. यावरून काँग्रेसला सेटिंगचा वास येत आहे. हट्टाने ६२ जागा घेतल्यात तर उमेदवार देणे, ही जबाबदारी होती. मात्र, जाहीर घोषणा करूनही वंचितने उमेदवार न दिल्यामुळे २२७ पैकी १६ जागांवर थेट दोन्ही पक्षांचा पराभव झाल्याचा आणि विरोधकांना त्यांनी चाल दिल्याचा मेसेज गेले आहे.

## हिंदूंमध्ये फूट पाडण्याची सुपारी घेतलेली दिसते महापौराच्या मुद्द्यावरून नितेश राणेंचा ठाकरे गटाला टोला



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१मुंबई**

राज्यात २९ महापालिकांच्या निवडणुकीच्या रणधुमाळीला सुरुवात झाली आहे. पण या महापालिका निवडणुकीत सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे ते मुंबई महापालिकेकडे. मुंबई महापालिकेवर २५ वर्ष शिवसेनेची (आताची ठाकरेंनी शिवसेना) सत्ता राहिली आहे. त्यांच्यासोबत भाजपही युती करून सत्ता होती. पण या महापालिकेचा कार्यकाळ २०२२ मध्ये संपुष्टात आला. परंतु, काही कारणांस्तव तेव्हा या निवडणुका होऊ शकल्या नाही. मात्र, आता ४ वर्षांनंतर या निवडणुका जाहीर झाल्या असल्याने मुंबई महापालिकेवर आपलाच झेंडा फडकावा आणि आपलाच महापौर बसावा, याकरिता युती आणि आघाडीने कंबर कसली आहे. पण मुंबई महापालिकेवर कोणत्या जातीधर्माचा महापौर बसवण्यात येणार? या मुद्द्यावरून राजकारण रंगल्याचे पाहायला मिळत आहे.


शिवसेना ठाकरे गट आणि मनसे युती जाहीर होताच यावेळी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुंबईचा महापौर हा मराठीच होईल, असे म्हटले आहे. तर, दुसरीकडे भाजपचे माजी मुंबई अध्यक्ष, आमदार आणि मंत्री असलेले आशिष शेलार यांनी मुंबईचा महापौर हा हिंदू होईल, असे म्हटले. पण दुसरीकडे मात्र, भाजपचे नेते कृपाशंकर सिंह यांनी 'मिरा भाईंदरचा महापौर उत्तर भारतीय होणार आणि उत्तर भारतीय महापौर होईल इतके नगरसेवक आम्ही निवडून आणू' असे वादग्रस्त वक्तव्य केले होते. ज्यानंतर मुंबईतील महापौरावरून मोठछा वाद झाला असून याच मुद्द्यावरून भाजपा आमदार तथा मंत्री नितेश राणे यांनी ठाकरे गटावर खोचक टीका केली आहे. ठाकरे गटाने हिंदूमध्ये फूट पाडण्याची सुपारी घेतलेली दिसते, असे टीकास्त्र राणेंनी ठाकरेंवर डागले आहे.

## नागपूर महापालिका निवडणुकीत अपक्षांना स्वपक्षातच मिळेना मान

### अपक्ष उमेदवारी दाखल करताच वधारला भाव

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१नागपूर**

नागपूर महानगरपालिका निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी शेवटच्या क्षणापर्यंत सर्वच राजकीय पक्षांत प्रचंड नाराजीनाट्य रंगलेलं होतं, त्यातच बंडखोरांनी राजकीय पक्षांची डोकेदुखी वाढवण्यास सुरुवात केलीय. भाजपाने बंडखोरांना शांत करण्यासाठीचे प्रयत्न सुरू केलेत. मात्र, काँग्रेसने आघाडीत असलेल्या मित्र पक्षांच्या क्षमतेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केलंय. नागपूर महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेसने कुणाशीही आघाडी न करता सर्व १५१ जागांवर आपले उमेदवार उभे केलेत, तर भाजपाने शिवसेनेसाठी ८ जागा सोडत १४३ जागी आपले उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरवलेत.



शेवटच्या क्षणापर्यंत उमेदवारी मिळेलच याच आशेवर असलेल्या कार्यकर्त्यांनी आधीच अपक्ष उमेदवार म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केलेला असल्याने आता त्यांची समजूत काढण्यात राजकीय पक्षांच्या नेत्यांना मनधरणी करावी लागणार आहे.

मध्य नागपूर विधानसभा मतदारसंघात हलबा समाजाचे मोठे प्राबल्य आहे. मात्र, यंदा भाजपाने माजी नगरसेवकांना उमेदवारी नाकारलीय, त्यामुळेच माजी नगरसेवकांमध्ये प्रचंड नाराजी पसरलेली आहे. अनेकांनी तर अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केलाय. प्रभाग क्रमांक २० मधून इच्छुक असलेले भाजपाचे माजी नगरसेवक भास्कर पराते यांनी तर पक्षातील अनेक नेत्यांना धडा शिकवणारच असल्याचा निश्चय पक्का केलाय.

संपादकीय ......

# मिळो आनंद, नांदो सुखसमृद्धी

*नवीन वर्ष सुरू झाले आहे. या निमित्ताने सर्व वाचकांना आपलं महानगरच्या वतीने खूप शुभेच्छा! या वर्षात भारताची भरभराट होवो, जगात भारताचा आर्थिक दबदबा निर्माण होवो, महाराष्ट्र देशातील नंबर एक राज्य व्हावे, अशी आपली सर्वांची इच्छा आहे. ही इच्छा २०२६ मध्ये पूर्ण व्हावी, ही सदिच्छा आहे. मात्र, नवीन वर्षात प्रवेश करताना जुन्या जखमाही सोबत नेत आहोत. मात्र, आता जखम होणार नाही, याची काळजी घेण्याची खरी गरज आहे. मागे वळून पाहिले तर २०२५ मध्ये अनेक घडामोडी घडल्या. यातील पहलगाममधील दहशतवादी हल्ला भीषण होता. २२ एप्रिल २०२५ रोजी बैसरन व्हॅलीत दहशतवाद्यांनी पर्यटकांना धर्म विचारून त्यांच्यावर बेधुंद गोळीबार केला होता. यात २६ पर्यटकांचा बळी गेला. पाकिस्तान पुरस्कृत या दहशतवादी हल्ल्यानंतर देशात संतापाची प्रचंड लाट उसळली होती. यानंतर कुठल्याही दबावाला न झुकता भारतीय सैन्याने नियोजन करून ७ मे रोजी ऑपरेशन सिंदूरला सुरुवात केली आणि पाकिस्तानमधील ९ दहशतवादी तळांवर हल्ला करून ७० दहशतवाद्यांचा खात्मा केला. काही दिवसांनी दोन हल्लेखोर दहशतवाद्यांचाही खात्मा केला. भारतीय सैन्याने या हल्ल्याचा बदला घेतला असला तरी त्या जखमेचे व्रण कायमचे राहिले आहेत.*

*पहलगामची सल भारताला कायम सलत राहील. अशीच दुसरी मोठी घटना अहमदाबादमध्ये घडली होती. १२ जून २०२५ रोजी अहमदाबाद विमानतळावरून लंडनला जाणारे बोईंग ड्रीमलाइनर विमान टेकऑफनंतर ३० सेकंदात कोसळले. या दुर्घटनेत क्रू मेंबरसह २४१ प्रवाशांचा मृत्यू झाला. तर ज्या होस्टेलवर विमान कोसळले तिथले ३४ जण जिवाला मुकले. अशा एकूण २७५ जणांचा मृत्यू झाला होता. आता भारतातच काय जगभरातही अशी दुर्घटना होऊ नये, हीच अपेक्षा आहे. या दोन दुर्घटनांसोबतच बॉम्बस्फोटामुळे दिल्लीसह देश हादरला होता. लाल किल्ल्याजवळील एका कारमधील स्फोटात १२ जणांचा बळी गेला होता. १० नोव्हेंबर रोजीची ही घटना होती. कारमधील बॉम्बस्फोट इतका भयंकर होता की बाजूला असलेल्या ८ ते १० गाड्याही पेटल्या होत्या, शिवाय २० जण जखमी झाले होते. स्फोटाचे गांभीर्य आणि व्याप्ती लक्षात घेऊन राष्ट्रीय तपास यंत्रणा तपास करत आहेत. यानंतर हा स्फोट कटाचा भाग असल्याचे समोर आले आहे. शिवाय स्फोट घडवणार्यांचा एका विद्यापीठाशी संपर्क असल्याने दिल्ली स्फोटाचे गूढ वाढतच गेले आहे. मात्र, राजधानी दिल्लीत आणि तोही गर्दीच्या ठिकाणी स्फोट घडवल्याने असुरक्षिततेची भीती वाढली आहे. नवीन वर्षात लोकांना निर्धास्त जगता येईल, बॉम्बस्फोटांसारखी कोणतीही दुर्घटना होऊ नये, ही सर्वांचीच अपेक्षा आहे. बॉम्बस्फोट, दुर्घटनाप्रमाणेच अपघातांमुळे २०२५ मधील आठवणी काळ्याकुट्ट झाल्या आहेत. कधी ट्रेनचा अपघात, कधी चेंगराचेंगरी, रोजचे रस्ते अपघात यात हजारोंचे बळी गेले आहेत. हे अपघात का होतात, कुणाच्या बेजबाबदारपणाचे हे बळी आहेत याचीही जाणीव सर्वांनी ठेवायला हवी.*

*आता २०२६ हे वर्ष दुर्घटनामुक्त होईल, याची काळजी तुम्ही-आम्ही सर्वांनी घ्यायला हवी! वास्तव पाहिले तर रस्ते अपघातात देशात लोक रोज किडामुंगीसारखे मरत आहेत. अपघातानंतर मृतांच्या नातेवाईकांना रक्कम जाहीर केली की विषय संपत नाही. तर दुर्घटना टाळण्यासाठी उपाययोजनांची गरज असते. या उपाययोजना यंदा होतील, अशी आशा बाळगूया! महत्त्वाचे म्हणजे देशातील बेरोजगारीची भीषण समस्या. देशात मोठ्या प्रमाणात परदेशी गुंतवणूक येत असली तरी नोकर्यांची समस्या सुटलेली नाही किंवा पुरेशा प्रमाणात नोकर्या उपलब्ध होत नाहीत. दावोसमध्ये सरकारने अनेक उद्योगसमूहांशी लाखो-कोटी रुपयांचे सामंजस्य करार केले आहेत. हे करार यंदा प्रत्यक्षात येतील, अशी आशा बाळगायला हरकत नाही. तसेच यंदा केंद्र सरकार आणि राज्य सरकारने मोठ्या प्रमाणात रोजगाराची संधी उपलब्ध करून द्यावी, अशीही माफक अपेक्षा ठेवत आहोत. त्याचवेळी कर्जमाफीची मागणी करणार्या शेतकर्यांना यंदा आणि तेही पहिल्या सहा महिन्यांत कर्जमुक्त करण्याचा प्रयत्न केल्यास त्यांचीही दुवा सरकारला मिळेल. अनेक वर्षे रेंगाळलेल्या जलजीवन मिशन योजना पूर्ण करून हजारो गावांची आणि कोट्यवधी ग्रामस्थांची पाण्याची समस्या सोडवावी, ही जुनी मागणी पूर्णत्वास नेली तर हजारो गावांचा मोठा प्रश्न सुटेल. त्याचप्रमाणे चांगले रस्ते नसणे ही महाराष्ट्राची मोठी समस्या आहे. तयार केलेले रस्ते दोन-तीन महिन्यांत खराब होतात. रस्ते, पाणी योजना, तसेच अनेक प्रकल्पांचा खर्च कमिशनबाजीमुळे फुगतो, यात नवीन काहीच राहिलेले नाही. २०२६ मध्ये अपेक्षा करूया की सामान्यांचे जगणे सुसह्य होईल, भ्रष्टाचार टप्प्याटप्प्याने का होईना, पण संपुष्टात येईल. पूर्वी सही करण्यासाठी लाच घेतली जायची आता ऑनलाईन क्लिक करण्यासाठी पैसे मागितले जातात, आधी टेबलाखालून किंवा बाहेर भेटून रोखीत व्यवहार केला जायचा. आता कुणाच्या तरी नावे ऑनलाईन पैसे पाठवले जातात. भ्रष्टाचार सुरूच आहे, फक्त त्याचे स्वरूप बदलले आहे. चांगले शिक्षण, नोकरी-व्यवसायाच्या योग्य संधी, सुलभ कररचना आणि हो सर्वात महत्त्वाचे म्हणजे जातीय सलोखा आणि धार्मिक समभाव अबाधित ठेऊन २०२६ मध्ये जनतेला तणावमुक्त करण्याचे काम सरकारने करावे, तरच सर्वांचे जीवन सुखी होईल! हे लक्षात घेऊनच भारतीयांना मिळो आनंद, नांदो सुखसमृद्धी याच शुभेच्छा!*

# विकासाची दूरदृष्टी असणारे नेतृत्व आमदार राजेश वानखडे




जनतेने नव्या उमेदीने लोक प्रतिनिधी म्हणून संधी दिल्यावर संधीचे सोने करण्याचा दृढसंकल्प आणि त्या दृष्टिने यशस्वी वाटचाल,जबाबदारीची जाण , पदाचा संवैधानिक अधिकार , सामाजिक जिव्हाळा , देश धर्म आणि न्याया प्रती निष्ठा , तळागळात जनतेशी थेट जुळेलेली नाळ, बोलण्यात स्पष्टता , कणखर तितकाच मृदू स्वभाव, शहर असो वा ग्रामीण भाग इथल्या विकासाचा ध्यास लोकांचा विकास साधण्याची तळमळ , त्याच प्रमाणे भारतीय जनता पक्षाचा आणि वरिष्ठ नेतृत्वाचा वैचारिक सामाजिक तसेच विकसित भारताचा अजेंडा घेऊन प्रत्यक्ष जमिनीवर काम करणारं नेतृत्व म्हणजे तिवसा विधानसभा क्षेत्राचे आमदार राजेश भाऊ वानखडेऐशा योजना घेऊन हाती करावी खेड्यांची निर्मिती त्यानेच आनंद नांदेल सर्वांप्रती ग्राम होई आदर्शग्रामगीता!!वरील ओवींचा आदर्श विचार घेऊन केंद्र आणि राज्य सरकार चे विकसित भारताचे स्वप्न आणि कार्य प्रत्यक्ष कृतीतून साकार करण्यासाठी काम करणारे आमदार.एक वर्षाच्या कारकीर्दीचा आढावा घेतला तर यापूर्वी काहींना शक्य झाले नाही अशी कामे गतिमान पध्दतीने मतदार संघात सर्वत्र गावोगावी भाऊनी पोचविले त्याच प्रमाणे विविध सामाजिक उपक्रम, दररोज जनसंपर्क यातून अनेक लोकांची कामे मार्गी लावत सुरु असलेली यशस्वी वाटचाल आपण पाहतोच आहेतिवसा मतदारसंघातील श्री गायत्री गोमाता पार्वती माता संस्थान सार्सी , श्री सिद्धीनियक गणपती संस्थान श्री क्षेत्र वायगाव या संस्थानला शासनाकडून ब वर्ग दर्जा मिळवून देण्याचे काम राजेश भाऊनि करून दिले, यातून भाऊंची काम करण्याची दूरदृष्टी आणि अचूक नियोजन याचा परिचय होतो ब वर्ग दर्जा प्राप्त संस्थान च्या ठिकाणी शासनाकडून कोट्यावधी रुपयांचा निधी मंजूर करने शक्य होते काही ठिकाणी निधी मंजूर सुद्धा करण्यात आला यातून आपल्या ग्रामीण भागातील संस्थान विकसित करण्याच्या कार्याला चालना मिळेल आता आपले संस्थान हि विकसित करता येईल सोबतच गावाचा विकास आणि कायापालट करता येणार हि अत्यंत आनंदाची बाब आहे.मुळात तिवसा तालुका संतांची भूमी म्हणून सर्वपरिचित आहे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांसह साधू संत परंपरा आपल्याला लाभली शिवाय भूमीला कोंडिन्य ऋषी च्या नावावरून प्राचीन विदर्भाची राजधानी कौंडण्यपूर माता रुक्मिणी भगवान श्रीकृष्ण असा पुरातन वारसा आपल्या भूमीला असताना यापूर्वी च्या लोकप्रतिनिधींनी याचे महत्व लक्षात घेऊन इथल्या संस्थांना बाबत एक मॉडेल निर्माण करण्या चे हेतूने पाहिजे तसे नियोजन केले असते तर चित्र काही वेगळे असते ही खंत लोकांच्या मनात साहजिकच येत असणार असो मात्र ज्या पध्दतीने आमदार साहेबांनी विकासाचा सपाटा लावला आहे त्या नुसार राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या या भूमीत महराजांचे वीचार घेऊन येणाऱ्या काळात भाऊंच्या माध्यमातून जनतेच्या साथीने अशी अनेक कार्ये होणार यात काही शंका नाही भाऊंच्या या विकासपर्वात सर्वांनी सहभागी होऊन कार्य करावे एक एक गाव विकसित केले एक एक सर्कल एक एक प्रभाग विकसित केले तर नक्कीच नवनिर्माण झाल्या शिवाय राहणार नाही .पार्वती माता संस्थान सार्सी ब वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा मिळवून दिल्या बद्दल आमदार राजेश भाऊ वानखडे यांचे हार्दिक अभिनंदन आणि धन्यवाद !....



**सचिन ज राऊत**
**मा.सरपंच**
**भारवाडी**

# नव्या वर्षात पहिल्या दिवसापासून वजन कमी करायचं असेल तर 'ही' कॉफी प्या



**दि.१विदर्भ प्रजासत्ताक** नवीन वर्ष सुरु झालं की अनेकजण संकल्प करतात. यंदा वजन कमी करायचं. जिम जॉइन करणं, डाएट प्लान, साखर-जंक फूड कमी करणं अशा गोष्टी सुरू होतात.(शळसहीं श्रींी लेषषशश) पण या सगळ्यात एक छोटा पण महत्त्वाचा प्रश्न अनेकांच्या लक्षात येत




नाही. आपण रोज पिणारी कॉफी वजन कमी करण्यास मदत करतेय की वाढवतेय? हॉट कॉफी की कोल्ड कॉफी, यामधला फरक समजून घेतला तर महिनाभरात बदल जाणवू शकतो. सध्या वजन कमी करण्याच्या प्रवासात कॉफी ही अनेकांची आवडती झाली आहे. सकाळची सुरुवात असो किंवा वर्कआउटनंतरचा थकवा, झोप यासाठी कॉफी रिफ्रेश करते. पण डाएट करणाऱ्या अनेकांच्या मनात प्रश्न येतो.(लेषषशश रपव ाशींरलेश्रळीा) हॉट कॉफी पिणं जास्त फायदेशीर की कोल्ड कॉफी? कारण दोघांचाही आपल्या शरीरावर वेगळा परिणाम होतो. कॉफी हे जगातील सर्वात आवडत्या पैयांपैकी एक आहे. जाणून घेऊया कोणती कॉफी वजन कमी करण्यासाठी फायदेशीर ठरते.

हॉट कॉफी प्यायल्याने शरीराचं तापमान वाढतं, यामुळे मेटाबॉलिझम ॲक्टिव्ह होतो आणि कॅलरीज जळण्याची प्रक्रिया वेगाने सुरु होते. ब्लॅक कॉफीमध्ये कॅफिन असल्यामुळे फॅट बर्निंगला चालना मिळते. सकाळी रिकाम्या पोटी किंवा वर्कआउटपूर्वी हॉट कॉफी घेतल्यास ऊर्जा वाढते. व्यायाम चांगल्याप्रकारे करता येतो. तसेच हॉट कॉफी भूक कमी करण्यास मदत करते, ज्यामुळे आपल्याला ओव्हरइटिंग थांबवता येते. कोल्ड कॉफी ही तिच्या बनवण्याच्या प्रक्रियेवर अवलंबून आहे. साधी ब्लॅक कोल्ड कॉफी घेतल्यास शरीर ती पचवण्यासाठी अधिक ऊर्जा वापरते. थंड पेयांना शरीराच्या तापमानाशी जुळवून घ्यावं लागतं. त्यामुळे थोड्या प्रमाणात कॅलरीज बर्न होतात. अनेकदा कोल्ड कॉफीमध्ये दूध, साखर, फ्लेवर सिरप किंवा आईस्क्रीम घातलेलं असतं. अशा कोल्ड कॉफीमुळे आपलं वजन भरपूर वाढू शकतं.

वजन कमी करण्यासाठी आपण कॉफीमध्ये काय घालतो हे सगळ्यात जास्त महत्त्वाचं. त्यात साखर, फुल क्रीम दूध, व्हीप्ड क्रीम घातल्यास कॉफी हेल्दी राहत नाही. नव्या वर्षात पहिल्या दिवसापासून वजन कमी करण्याचा विचार करत असाल, तर ब्लॅक हॉट कॉफी हा सर्वात सुरक्षित आणि परिणामकारक पर्याय ठरतो. तसेच योग्य प्रकारे व्यायाम, पुरेसा आहार आणि झोप घेतल्यास आपले वजन महिन्याभरात कमी होईल.

# असे करा डाळिंब बागेवरील कीड-रोग व्यवस्थापन, एकही फळ वाया जाणार नाही!




**दि.१विदर्भ प्रजासत्ताक**

डाळिंब कीड-रोग व्यवस्थापनासाठी एकात्मिक पद्धतीचा वापर महत्त्वाचा आहे, ज्यात स्वच्छता, जैविक उपाय आणि गरजेनुसार रासायनिक उपाय करणे गरजेचे असते.

**मृग बहार (बागेची अवस्था विश्रांती)**

**किड व्यवस्थापन**

विश्रांती काळामध्ये बागेची नियमित पाहणी करावी. बागेमध्ये खोडकिडा, पिन होल बोरर, वाळवी आणि पाने खाणारी अळी यांचा प्रादुर्भाव दिसून आल्यास गरजेनुसार १५ ते २० दिवसांच्या अंतराने योग्य फवारणी करावी.

वर सुचविल्याप्रमाणे व्यवस्थापन हे किडींचा प्रादुर्भाव दिसून आल्यावरच करावे.

**विश्रांती काळामध्ये झाडांना खालीलप्रकारे पेस्ट बनवून लावावी.**

लाल माती ४ किलो + क्लोरपायरिफॉस (२० ईसी) २० मि.ली. + कॉपर ऑक्सीक्लोराइड (५० डब्ल्यूपी) २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाणी किंवा १०% बोर्डो पेस्ट क्लोरोपायरीफॉस (२० ईसी) २० मि.ली. प्रति १० लिटर पाणी याप्रमाणे वापरुन तयार केलेली पेस्ट झाडाच्या खोडाला जमिनीपासून २-२.५ फुटांपर्यंत लावावी.

रसायनांच्या वापरासाठी राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राने प्रकाशित केलेल्या ड-हॉक लिस्टचा वापर केला जाऊ शकतो.

**रोग व्यवस्थापन**

विश्रांतीच्या काळात १० ते १५ दिवसांच्या अंतराने खालील फवारण्या हवामान आणि पीक समस्यांनुसार घ्याव्यात.

१% बोर्डो मिश्रण किंवा कॉपर ऑक्सीक्लोराइड (५० डब्ल्यूपी) २-२.५ ग्रॅम किंवा कॉपर हायड्रॉक्साईड (५३.८ डब्ल्यूपीद) २ ग्रॅम किंवा ब्रोनोपॉल (९५%) ०.५ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे आलटून-पालटून वापरावीत.

बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव आढळल्यासय मॅन्कोझेब (७५ डब्ल्यूपी) २ ग्रॅम प्रति लिटर पाणी किंवा इतर योग्य बुरशीनाशकाची एक फवारणी ॲग्रोकेमिकल्सच्या ड-हॉक सूचीमध्ये नमूद केलेल्या बुरशीनाशकांपैकी घेतली जाऊ शकते.

बोर्डो मिश्रण सोडून सर्व ओषधांमध्ये फवारणीवेळी चांगल्या प्रतीचे स्टिकर स्प्रेडर ०.२५ मि.ली. प्रति लिटर पाणी याप्रमाणे मिसळावे.

– ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र इगतपुरी

### काही सेकंदात स्पर्धकाने १ कोटींच्या प्रश्नाचं उत्तर दिलं

# अन् KBC १७ ला मिळाला दुसरा करोडपती, अमिताभही झाले थक्क

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१मुंबई** छोट्या पडद्यावरील प्रसिद्ध क्विझ शो 'कौन बनेगा करोडपती सीजन १७' (घइउ १७) ला या सीजनचा दुसरा करोडपती मिळाला आहे. झारखंडच्या रांची येथील रहिवासी असलेले बिप्लब बिस्वास यांनी हुशारीच्या जोरावर १ कोटी रुपये आणि एक कार जिंकली आहे. विशेष म्हणजे १ कोटीच्या प्रश्नाचे उत्तर त्यांनी कोणत्याही लाईफलाईनशिवाय अवघ्या काही सेकंदात दिले, ज्यामुळे अमिताभ बच्चनही थक्क झाले.

## काय होता १ कोटीचा प्रश्न?

अमिताभ बच्चन यांनी १ कोटी रुपयांसाठी विचारलेला प्रश्न असा होता की, स्टॅच्यू ऑफ लिबर्टीला फ्रान्समधून अमेरिकेत पोहोचवणाऱ्या जहाजाचे नाव काय होते? बिप्लब यांनी कोणतीही लाइफलाइन न वापरता आणि वेळ न घालवता क्षणात उत्तर दिले - 'इसेरे' (खीशीश). त्यांना केवळ जहाजाचेच नाही, तर ते जहाज चालवणाऱ्या कॅप्टनचे नावही माहित होते. त्यांच्या या आत्मविश्वासामुळे अमिताभ बच्चन प्रभावित झाले आणि त्यांनी बिप्लब यांना आनंदाने मिठी मारली.

**कोण आहेत बिप्लब बिस्वास?**

बिप्लब बिस्वास हे केंद्रीय राखीव पोलीस दलात (उठझऋ) इन्स्पेक्टर म्हणून कार्यरत आहेत. सध्या त्यांची नियुक्ती



छत्तीसगडमधील नक्षलग्रस्त अशा बीजापूर जिल्ह्यात आहे. खेळादरम्यान त्यांनी जंगलातील अत्यंत कठीण परिस्थिती आणि तिथे जिवंत राहण्यासाठी करावा लागणारा संघर्ष याबद्दल सांगितले. आपल्या शहीद सहकाऱ्यांच्या आठवणीने ते भावूक झाले, तेव्हा बिग बींनी त्यांना सांत्वन दिले.

**अमिताभ बच्चन यांचे विशेष आमंत्रण**

बिप्लब यांनी 'सुपर संदूक' राउंडमध्ये सर्व १० प्रश्नांची अचूक उत्तरे दिली, ज्यामुळे १ लाख रुपये थेट त्यांच्या खात्यात जमा झाले. त्यांच्या या उत्कृष्ट खेळावर खूश होऊन अमिताभ बच्चन यांनी बिप्लब आणि त्यांच्या कुटुंबाला आपल्या घरी जेवणासाठी आमंत्रित केले आहे. आता १ कोटी रुपये जिंकल्यानंतर बिप्लब आता या सीजनचे पहिले 'सात करोडपती' बनणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पुढील भागात ते ७ कोटी रुपयांसाठीच्या प्रश्नाचा सामना करणार आहेत.

# स्वीप उपक्रमांतर्गत अमरावती शहरात खेळाडू व तरुणांमध्ये मतदान जनजागृती




**विदर्भ प्रजासत्ताकदि.१अमरावती**

७अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्या दृष्टीने महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात सर्वत्र प्रभावी मतदान जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत. लोकशाही बळकटीकरणासाठी प्रत्येक नागरिकाने मतदानाचा हक्क बजावावा, या उद्देशाने स्वीप (डतएएझ - ड्रींशारींळल तींर्शीी' एर्वीलरींळेप रपव एश्रशलीेरश्र झरी-ींळलळरिींळेप) उपक्रमांतर्गत विविध नाविन्यपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.या उपक्रमाचा एक भाग म्हणून अमरावती शहरातील विविध मैदानांवर सकाळी व संध्याकाळी व्यायाम करणारे नागरिक, खेळाडू व तरुण यांना मतदानाबाबत जागरूक करण्यात येत आहे. यावेळी उपस्थितांना मतदानाची शपथ देण्यात येत असून मतदान का आवश्यक आहे, लोकशाही व्यवस्थेत मतदाराची भूमिका किती महत्त्वाची आहे, तसेच प्रत्येक पात्र नागरिकाने कोणत्याही दबावाशिवाय, निर्भयपणे मतदान केले पाहिजे, याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येत आहे.स्वीप उपक्रमांतर्गत पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर नुकताच विशेष मतदान जनजागृती कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात उपस्थित खेळाडू व तरुणांना मतदानाची शपथ देण्यात आली. मी आगामी अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत निश्चितपणे मतदान करीन व इतरांनाही मतदानासाठी प्रेरित करीन, असा संकल्प यावेळी सहभागी नागरिकांनी केला.या प्रसंगी महानगरपालिका शाळा निरीक्षक योगेश पखाले, सहाय्यक क्षेत्रीय अधिकारी राहुल तायडे यांच्यासह मोठ्या संख्येने खेळाडू, युवक व नागरिक उपस्थित होते. अधिकाऱ्यांनी तरुणांना संबोधित करताना लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले तसेच मतदान हा केवळ हक्क नसून नागरिकांचे राष्ट्रीय कर्तव्य आहे, असे स्पष्ट केले.अमरावती महानगरपालिकेच्या वतीने शहरातील विविध भागांत अशाच प्रकारचे जनजागृती उपक्रम सातत्याने राबविण्यात येणार असून या माध्यमातून युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक व पहिल्यांदाच मतदान करणारे मतदार यांना मतदानासाठी प्रेरित करण्यात येणार आहे. या प्रयत्नांमुळे आगामी महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाचा टक्का लक्षणीयरीत्या वाढेल, असा विश्वास प्रशासनाकडून व्यक्त करण्यात आला आहे.

# विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांची प्रधान सचिवपदी पदोन्नती

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१अमरावती**

११नागपूर विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांची आज प्रधान सचिव म्हणून सध्याच्याच नागपूर विभागीय आयुक्त पदावर स्थानापन्न पदोन्नती देण्यात आली आहे.महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्हि.राधा यांच्या स्वाक्षरीने निघालेल्या शासकीय आदेशात विजयलक्ष्मी बिदरी यांचे सध्याचेपद भारतीय प्रशासन सेवेच्या प्रधान सचिव श्रेणीत उन्नत करून सध्याच्याच पदावर स्थानापन्न पदोन्नती देण्यात आल्याचे निर्देशित करण्यात आले आहे.



आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. १ जानेवारी २०२६ शहर/ग्रामिण

## नवीन प्रारूप मतदार यादीतील अनेक नावे संशयास्पद

# शिक्षक मतदारसंघात बोगस मतदारांचा शिरकाव

### सर्वाधिक बोगस मतदार बुलढाणा जिल्ह्यातील, विभागीय आयुक्तांकडून चौकशीचे निर्देश

**चंद्रशेखर भोयर यांचा दावा**



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती** अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघातील निवडणूक प्रक्रियेला हादरा देणारा गंभीर प्रकार उघडकीस आला असून, नवीन प्रारूप मतदार यादीत तब्बल तीन ते चार हजार बोगस व अपात्र मतदारांची नोंद झाल्याचा खळबळजनक दावा शिक्षक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष व भाजप शिक्षक आघाडीचे प्रदेश सहसंयोजक चंद्रशेखर भोयर यांनी केला आहे.

निवडणूक आयोगाने ३ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्याप्रारूप मतदार यादीत एकूण २९,८१६ मतदारांचा समावेश करण्यात आला आहे. मात्र ही यादी पाहता लोकशाहीच्या मुळावरच घाव घालण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप करत, भोयर यांनी निवडणूकआयोग तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे थेट लेखी तक्रार दाखल केली आहे. चंद्रशेखर भोयर यांनी दिलेल्या



माहितीनुसार, प्रारूप मतदार यादीत सर्वाधिक बोगस मतदार हे बुलढाणा जिल्ह्यातील असल्याचे स्पष्ट झाले आहे. अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या मागील निवडणुकीतही मोठ्या प्रमाणावर बोगस मतदारांची नोंद आढळून आली होती. त्याच बोगस मतदारांमुळे निवडणुकीचा निकाल अनपेक्षित व वेगळा लागल्याचा आरोप यापूर्वीही झाला होता. याच प्रकाराची पुनरावृत्ती यावेळीही होण्याची शक्यता व्यक्त करत, ही बाब लोकशाही प्रक्रियेसाठी घातक असल्याचा इशारा भोयर यांनी दिला आहे. नवीन प्रारूप मतदार यादी मध्ये अमरावती ८, १०४, बुलढाणा जिल्हा ८,५५९, यवतमाळ जिल्हा ५,७१४, अकोला जिल्हा ४,८८३, आणि वाशिम जिल्ह्यातील ३,०६० अशा एकूण २९,८१६ मतदारांचा समावेश आहे.

**तपासणी करण्याचे विभागीय आयुक्तांचे निर्देश**

चंद्रशेखर भोयर यांनी केलेल्या तक्रारीची गंभीर दखल घेत अमरावती विभागीय आयुक्त तथा मुख्य मतदार नोंदणी अधिकारी यांनी विभागातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश दिले आहेत. प्रारूप मतदार यादीतील प्रत्येक मतदार पात्र आहे की नाही याची सखोल तपासणी करून, अपात्रवबोगस मतदारांची नोंदणी रद्द करावी तसेच केलेल्या कारवाईचा सविस्तर अहवाल तातडीने सादर करावा, असे निर्देश विभागीय आयुक्तांनी जारी केलेल्या पत्रात नमूद करण्यात आले आहेत.

# १४ नामांकन रद्द; ८१९ उमेदवार निवडणूक रिंगणात

## मनपा निवडणूक रणधुमाळी जोरात

### सर्वाधिक झोन ४ मधून ४ उमेदवार बाद




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती–**

महापालिका निवडणुकीसाठी शेवटच्या दिवस अखेर सातही झोनमध्ये ८७ जागांसाठी सुमारे उमेदवारांनी ८३३ नामांकन दाखल केले होते. यापैकी सातही प्रभागातून १४ उमेदवारांचे नामांकन विविध कारणामुळे बाद झाले असून आता रिंगणात तूर्त ८१९ उमेदवार कायम आहेत.

शेवटच्या दिवस अखेर विशेष म्हणजे झोन १ मधून ११८ उमेदवारांनी १७१, झोन–२ मधून १२९ उमेदवारांनी १३८, झोन ३ मधून १२२ उमेदवारांनी १४८, झोन ४ मधून १३३ उमेदवारांनी २०५, झोन पाच मधून १११ उमेदवारांनी १२६, झोन ६ मधून ६९ उमेदवारांनी ८१ आणि झोन ७ मधून १५१ उमेदवारांनी असे एकूण ८३३ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. यामध्ये सर्वाधिक नामांकन झोन ४ मध्ये १३३ उमेदवारांनी २०५ नामांकन फॉर्म भरले होते.सहा दिवसांपासून मिळालेल्या अर्जाची छाननी झोननिहाय बुधवारला सकाळी सुरुझाली. यात झोन १ – रामपुरी कॅम्प मधून ११८ उमेदवारांनी नामांकनदाखल केले होते. छाननीत दोन उमेदवारांचे अर्ज अवैध ठरल्यामुळे ते निवडणूक मैदानातून बाद ठरले आहे. त्यामुळे आता तूर्त झोन १ मध्ये ११६ उमेदवार रिंगणात आहे.झोन – २ नवी तहसील कार्यालय मोर्शी रोड कार्यालय येथे १२९ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज भरले होते. बुधवारला छाननी दरम्यान एका उमेदवाराचे नामांकन अवैध ठरले. त्यामुळे तूर्त १२८ उमेदवार कायम आहे.झोन–३ मध्य राजापेठ मध्ये १२२ उमेदवारांनी नामांकन दाखल केले होते. त्यातील छाननीत २ नामांकन बाद झाले. यातील एक प्रभाग १८ मधील तर दुसरा प्रभाग १२ मधील एका उमेदवाराचा समावेश आहे. त्यामुळे या ठिकाणी निवडणूक मैदानात तूर्त १२० उमेदवार शिल्लक आहेत.

झोन ४ पूर्व झोन दस्तुरनगरमध्ये एकूण १३३ उमेदवारांनी नामांकन दाखल केले होते. बुधवारला छाननीदरम्यान ४ उमेदवारांचे नामांकन बाद झाले. त्यामुळे या ठिकाणी निवडणूक मैदानात १२९ उमेदवार कायम आहे.

झोन ५ मनपा शिक्षण विभाग अंबापेठ येथे १११ उमेदवारांनी नामांकन दाखल केले होते. त्यापैकी एका उमेदवाराचां अर्ज छाननीत अवैध ठरला. त्यामुळे या ठिकाणी निवडणूक मैदानात तूर्त ११० उमेदवार कायम आहेत.

झोन ६ जुनी तहसील मध्ये ६९ उमेदवारांनी नामांकन दाखल केले होते. मात्र छाननीमध्ये २ उमेदवारांचे नामांकन बाद झाले. त्यामुळे या ठिकाणी तूर्त ६७ उमेदवार कायम आहे.

झोन ७ दक्षिण झोन बडनेरात १५१ उमेदवारांनी नामांकन दाखल केले होत.पण, बुधवारला छाननी दरम्यान २ उमेदवारांचे अर्ज अवैध ठरल्यामुळे निवडणूक मैदानातून ते बाद ठरले. त्यामुळे तूर्त या झोनमध्ये सध्या १४७ उमेदवार निवडणूक रिंगणात कायम आहे.

**उद्या नामांकन परत घेण्याची मुदत**

तूर्त निवडणूक मैदानात सातही झोनमध्ये ८२६ उमेदवार रिंगणात कायम आहे. मात्र शुक्रवार २ डिसेंबरला उमेदवारांना नामांकन परत घेण्याचा अंतिमदिनांक आहे. त्यानंतर खरे चित्र स्पष्ट होईल. तर ३ डिसेंबरला चिन्ह वाटप झाल्यानंतर खऱ्या अर्थाने सर्वांच्या प्रचाराला सुरुवात होणार आहे.–

**अमरावती पालिका निवडणूक**

# काँग्रेस दोन नगरपालिकांतून हद्दपार:

## भाजपने १०२ जागा जिंकत वर्चस्व राखले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती–**

अमरावती जिल्ह्यातील १० नगरपालिका आणि दोन नगरपंचायतींच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या. या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने (भाजप) मोठे यश मिळवले. भाजपने सहा नगराध्यक्षपदांसह सर्व १२ स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नगरसेवक निवडून आणले, तर काँग्रेसला दोन नगरपालिकांमध्ये एकही जागा जिंकता आली नाही. यामध्ये धामणगाव रेल्वे आणि शेंदुरजनाघाट नगरपालिकेचा समावेश आहे.

जिल्ह्यातील सर्व १२ स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजपने एकूण १०२ जागा जिंकल्या आहेत. या तुलनेत काँग्रेसला ७९ जागांवर विजय मिळवता आला, ज्यामुळे काँग्रेस भाजपपेक्षा २३ जागांनी मागे राहिली. धामणगाव रेल्वे येथे भाजपने सर्वच्या सर्व २० जागा जिंकून एकहाती सत्ता मिळवली. त्याखालोखाल २६ सदस्यीय वरुडमध्ये भाजपने १८ जागा पटकावल्या. तसेच, चांदूर रेल्वे आणि शेंदुरजनाघाट या २० सदस्यीय नगरपालिकांमध्ये भाजपने प्रत्येकी ११ जागा जिंकल्या.

भाजपने ४१ सदस्यीय अचलपूरमध्ये ९, चिखलदऱ्यात ८, मोर्शी आणि अंजनगाव सुर्जीत प्रत्येकी ६, दर्यापूर व धारणीत प्रत्येकी ४, नांदगाव खंडेश्वरमध्ये ३ आणि चांदूर बाजार येथे २ जागा मिळवल्या. दुसरीकडे, काँग्रेसने सर्वाधिक १७ जागा दर्यापूरमध्ये जिंकल्या. त्याखालोखाल १५ जागा अचलपूरमध्ये, १२ चिखलदरा



येथे, ९ अंजनगाव सुर्जीत आणि ८ धारणीत मिळवल्या. दर्यापूर, चिखलदरा आणि धारणीमध्ये काँग्रेसला मिळालेल्या जागा सभागृहातील एकूण संख्येच्या निम्म्याहून अधिक आहेत. अचलपूरमध्ये १० अपक्षांची साथ मिळाल्यास काँग्रेस तेथेही आपले प्राबल्य सिद्ध करू शकते.काँग्रेसला मोर्शीत ६, नांदगाव खंडेश्वरमध्ये ५, चांदूर रेल्वेत ४, वरुडमध्ये २ आणि चांदूरबाजारमध्ये एक जागा मिळाली. मात्र, धामणगाव रेल्वे आणि शेंदुरजनाघाट या दोन नगरपालिकांमध्ये काँग्रेसला आपले खाते उघडता आले नाही.मोर्शी नगरपालिकेत नगराध्यक्षपद शिंदे गटाच्या शिवसेनेने जिंकले असले तरी, नगरसेवकांच्या संख्येच्या बाबतीत येथे अत्यंत विचित्र स्थिती निर्माण झाली आहे. येथे काँग्रेस, शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपला प्रत्येकी ६ जागा मिळाल्या आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीचा घटक पक्ष म्हणून काँग्रेस आणि शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येऊन १२ जणांचा गट सहज तयार करू शकतात. याउलट, महायुतीतील प्रमुख पक्ष भाजपचे ६, शिंदे सेनेचे २, अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे २ आणि प्रहारचा एक असे मिळून ११ सदस्य होतात. मोर्शीतील सत्ता स्थापनेचा खेळ रोडे गटाच्या एका सदस्याच्या भूमिकेवर अवलंबून असेल.

# सीपी ओलांकडून ४ पिस्तुल परवाने रद्द

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती–**



अमरावती महापालिका निवडणुकीदरम्यान पोलिस विभागाने सक्रियपणे परवाना–धारक बंदुक जमाकरणे सुरु केले आहे. अशातच पोलिस आयुक्त राकेश ओला यांनी सुरू केलेल्या कारवाईचा भाग म्हणून शहरात चार पिस्तूल परवाने रद्द करण्यात आले आहेत. संबंधित कागद पत्रांची सखोल तपासणी आणि परवाना अटींचे उल्लंघन केल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अमरावती पोलिस आयुक्तालय क्षेत्रात ज्या परवानाधारकांवर कारवाई करण्यात आली त्यांच्या कागदपत्रांमध्ये अनियमितता आढळून आली, तसेच त्यांनी परवाना अटींचे पालन केले नाही. पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, शहरातील इतर शत्र परवान्यांचीही कडक तपासणी केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अमरावती शहरात सध्या ३५८ परवानाधारक आहेत, ज्यात ३७२ परवानाधारक शस्त्रे नोंदणीकृत आहेत.कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी ही मोहीम भविष्यातही सुरू राहील असे पोलिस आयुक्तालयाने म्हटले आहे. याप्रकरणात, सर्व धारकांच्या कागदपत्रांची कसून तपासणी केली जात आहे. शिवाय, निवडणूक पर्यंत नवीन परवान्यांसाठी अर्ज स्थगित ठेवले आहे.

# अपघातात दोघांचा मृत्यू, तिघे गंभीर जखमी

### लखापूर फाट्याजवळील दुर्घटना

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१दर्यापुर,**

बैलगाडी आणि दुचाकीच्या घडकेमुळे झालेल्या भीषण अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला तर तिन जण गंभीर जखमी झाले. बुधवारी ३१डिसेंबरला संध्याकाळी ७ वाजताच्या सुमारास लखापूर फाट्याजवळील मुख्य मार्गावरील पुलावर हा अपघात झाला.


अमरावतीचे चार मित्र दोन दुचाकींवर खोलापूर मार्गावरुन दर्यापूर तालुक्यातील लासूर येथील आनंदेश्वर मंदिराच्या दर्शनाकरिता जात होते. यावेळी लखापूर फाट्याजवळ पुलावर कापसाने भरलेली बैलगाडी रस्ता ओलांडत होती. त्यावेळी भरधाव दुचाकी बैलगाडीला धडकली. ही धडक एवढी जोरदार होती की, आर्यन जाधव आणि सूर्या या दोघांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच शिवसेनेचे रुग्णसेवक गोपाल अरबट ॲम्बुलन्स सह घटनास्थळी पोहचले, त्यांनी मृतक आणि जखमींना रुग्णालयात पोहचवले. यादरम्यान खा. बळवंत वानखडे यांनी रुग्णालयात जाऊन घटनेची माहिती घेतली. दर्यापूर पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. मृतकांमध्ये आर्यन जाधव (१९, खापर्डे बगीचा, अमरावती) आणि बैलगाड़ीवरील सूर्या (२२,) यांचा समावेश आहे. तर जखमींमध्ये प्रसन्न नितिन माटे (१९), प्रज्वल गुरुदेव उमेकन (१९) आणि पार्थ रवि गाभण (२०) (सर्व रा. अमरावती) यांच समावेश आहे.

# ५१४ लोकांना कारणे दाखवा नोटीस

### प्रशिक्षण व कर्तव्यात गैरहजर अधिकारी–कर्मचाऱ्यांवर कारवाई – आयुक्तांची खंबीर भूमिका

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१अमरावती**

अमरावती महानगरपालिकेच्या क्षेत्रात निवडणूक प्रक्रियेच्या अनुषंगाने नेमणूक करण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांपैकी ५१४ जण गैरहजर राहिल्याने त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, शिस्तबद्ध आणि कायद्याच्या चौकटीत पार पडावी यासाठी प्रशासन कटिबद्ध असून, कर्तव्यात कसूर करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची स्पष्ट भूमिका आयुक्तांनी मांडली आहे.प्रशिक्षणाच्या व्यवस्थेसाठी मनपाचे एकुण पथक ९०० व एकुण कर्मचारी ३६०० अधिकारी, कर्मचारी



नियुक्त करण्यात आले होते. निवडणूक प्रशिक्षण सत्रांना अनुपस्थित राहणे अथवा प्रत्यक्ष निवडणूक कर्तव्यात गैरहजर राहणे ही गंभीर बाब असून, अशा प्रकारच्या दुर्लक्षामुळे संपूर्ण निवडणूक व्यवस्थेवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असून, समाधानकारक उत्तर न मिळाल्यास शिस्तभंगाची कारवाई, विभागीय चौकशी तसेच नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.निवडणूक कर्तव्य हे कायदेशीर व अनिवार्य असून त्यात हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही. सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणाला उपस्थित राहून आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडावी, अन्यथा कठोर परिणामांना सामोरे जावे लागेल, असा इशाराही त्यांनी दिला. प्रशासनाकडून पुढील काळात उपस्थितीवर काटेकोर लक्ष ठेवण्यात येणार असून, निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येणार आहे.

# भुलोरी ग्रामपंचायतीत ‘पेसा दिन’ उत्साहात साजरा

### मुख्यमंत्री समृद्ध अभियानांतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अचलपूर** : चिखलदरा पंचायत समिती अंतर्गतभुलोरी ग्रामपंचायतीत मुख्यमंत्री समृद्ध अभियान अंतर्गत २४ डिसेंबर रोजी ‘पेसा दिन’ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या उपक्रमा अंतर्गत महिलांसाठी रोजगारा भिमुख प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आवळ्यापासून विविध पदार्थ, तसेच महुआपासून लाडू, आवळा सुपारी, आवळा जेली, आवळा लाडू आदी विविध खाद्यपदार्थ तयार करण्याचे प्रात्यक्षिक व प्रशिक्षण देण्यात आले. ग्रामपंचायतीतील महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेत प्रत्यक्ष पदार्थ तयार करून दाखविले.पेसा दिनाच्या निमित्ताने आदिवासी संस्कृती जतन करण्यासाठी पारंपरिक नृत्यांचे आयोजन करण्यात आले. यासोबतच व्हॉलीबॉल व खो–खो (केलाची) स्पर्धांचे आयोजन करण्यात येऊन युवकांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदविला.या सर्व कार्यक्रमांना ग्रामस्थांचा मोठा प्रतिसाद लाभला आहे.

# वरूड तालुक्यात पुन्हा धर्मांतरणाचा प्रयत्न

## सकल हिंदू समाजाचा ठाणेदाराविरूद्ध रोष

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१वरूड,**

तालुक्यातील बेनोडा पोलिस ठाणे हद्दीतील पडसोडा गावात हिंदू धर्मातील अंकुश भीमराव बोरवार याला १९ जूलै रोजी ख्रिश्चन धर्म स्वीकारण्यासाठी जबरदस्ती करण्यात आली होती. ख्रिश्चन मिशनर्यांच्या या धर्मांतरणाचा भांडाफोड झाल्यानंतर २० जुलैला याप्रकरणी तक्रार करण्यात आली होती. परंतु, याप्रकरणी बेनोडा पोलिसांनी दुर्लक्ष केल्याने २५ जुलै रोजी सकल हिंदू समाजाच्या वतीने बेनोडा पोलिस ठाण्यावर धडक देऊन ठाणेदार विवेक देशमुख यांना निवेदन दिले होते. असाच प्रकार ३० डिसेंबर रोजी पुन्हा बेनोडा पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडल्याने सकल हिंदू समाज आक्रमक झाल्याचे पहायला मिळाले.

धर्मप्रसार करणार्यांकडून पुन्हा तालुक्यातील बेनोडा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील लोणी नजिक असणार्या ग्राम शिंगोरी येथे ३० डिसेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता गावात वाढदिवसाच्या नावाने ख्रिश्चन धर्माचे पादरी ख्रिश्चन धर्माचा प्रचार करीत होते. हिंदू धर्माला शिव्या देत होते आणि तेथील लोकांना पैश्याचे प्रलोभन देऊन ख्रिश्चन धर्मात सामील व्हा असा संदेश देत होते, हि बाब लोणी परिसरातील सकल हिंदू समाजाच्या कार्यकर्त्यांच्या काणी पडताच त्यांनी शिंगोरी गाठली व त्यांचा डाव उधळून लावला. बेनोडा पोलिसांना याप्रकरणाची माहिती देण्यात आली, तेव्हा ठाणेदार विवेक देशमुख त्यांच्या ताफ्यासह घटनास्थळी दाखल झाले. सकल हिंदू समाजाच्या मागणीनुसार सदरील लोकांविरुद्ध ठाणेदार देशमुख यांनी तक्रार दाखल करून घ्यावी असे सांगितल्या नंतरही पोलिस तक्रार दाखल करण्यास



टाळाटाळ करत असल्याचे त्यांच्या निर्दशनास येताच विश्व हिंदू परिषद बजरंग दल व पोलिसांमध्ये वाद–विवाद झाला. त्यानंतर स्थानिक आमदार चंदू उर्फ उमेश यावलकर यांनी पोलिस स्टेशन गाठले व ठाणेदारांना धारेवर धरले. लक्ष्मण शेंडे रा. शिंगोरी यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी याप्रकरणी आठ जणांविरुद्ध गुन्ह्याची नोंद करून घेतली व सर्व आरोपींताना अटक सुद्धा करण्यात आली आहे.

**खपून घेणार नाही : आ. यावलकर**

आ. यावलकर यांनी पोलिस प्रशासनाला ठणकावून सांगितले की, असे प्रकार जर माझ्या मतदारसंघात झाले तर खपून घेणार नाही. पहाटे तीन वाजेपर्यंत रितसर तक्रारीची प्रत विश्व हिंदू परिषद, बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांना देण्यात आली. यावेळी नितीन कुबडे, निखिल बोडखे, योगेश अडलक, सुकेश भोपती, पवन साखरे, मॉन्टी नागदेवे, अतिश कालबेडे, जय वडस्कर यांच्यासह सकल हिंदू समाजाचे अन्य कार्यकर्ते ठाण्यात उपस्थित होते.




# पत्नी करेल पतीविरुद्ध प्रचार !

## पतीच्या बंडखोरीमुळे भाजपच्या माजी महापौर गेल्या माहेरी

## तिकीटवाटपाचा वाद थेट घरात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१नागपूर** माजी महापौर अर्चना डेहनकर यांचे पती विनायक डेहनकर यांनी प्रभाग १७ मधून भाजपचे तिकीट न मिळाल्याने पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिला व बंडखोरी करत अपक्ष अर्ज दाखल केला. यामुळे पक्षाच्या गोटातदेखील विविध चर्चांना उधाण आले आहे. अर्चना डेहनकर यांनी त्यांच्या पतीला यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र त्यात यश न आल्याने अखेर अर्चना डेहनकर यांनी थेट भावाचे घर गाठले. निवडणूकीत मी भाजपचा प्रचार करणार असल्याने एकाच घरात परस्परविरोधी भूमिका नको म्हणून हे पाऊल उचलल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विनायक डेहनकर हे मागील अनेक वर्षांपासून भाजपमध्ये कार्यरत होते. त्यांना विविध निवडणूकींमध्ये पक्षाने मोठ्या जबाबदाऱ्यादेखील दिल्या. अर्चना डेहनकर या महापौरपदीदेखील होत्या. मात्र या निवडणूकीत पक्षाने विनायक डेहनकर यांना तिकीट नाकारले. त्यांच्या प्रभागातून काँग्रेसमधून भाजपमध्ये आलेल्या मनोज साबळे यांना तिकीट देण्यात आले. त्यामुळे विनायक डेहनकर यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली व पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिला. त्यातून अर्चना डेहनकर नाराज झाल्या व त्या त्यांच्या भावाकडे निघून गेल्या. याबाबत अर्चना डेहनकर यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी याला दुजोरा दिला. मी माझ्या पतीला निवडणूकीत सहकार्य करणार नाही. मी भाजपसाठीच प्रचार करणार आहे व एका घरात राहून ते शक्य होणार नाही. त्यामुळेच मी काही दिवस भावाकडे राहणार आहे, असे त्यांनी सांगितले.



### बाहेरील उमेदवारांना तिकीट का दिले ?

१९८४ पासून मी भाजपचा कार्यकर्ता आहे. प्रभाग १७ मध्ये तरुण उमेदवारांना तिकीट दिली असती तर काहीच हरकत नव्हती. मात्र बाहेरील पक्षातून आलेल्या व बाहेरील प्रभागात राहणाऱ्या लोकांना उमेदवारी दिली. यामुळेच मी नाराज असून अपक्ष अर्ज दाखल केला आहे, असे विनायक डेहनकर यांनी स्पष्ट केले.-

# चक्क 'एबी फॉर्म'च खाऊन टाकला!

## पुण्यात दोन इच्छुक उमेदवार भिडले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१पुणे**-पुणे महानगर पालिका निवडणुकीच्या उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या टप्प्यात धनकवडी-सहकारनगर परिसरात एक अत्यंत धक्कादायक आणि विचित्र प्रकार समोर आला आहे. प्रभाग क्रमांक ३६ (अ) मध्ये शिवसेना शिंदे गटाच्या दोन इच्छुक उमेदवारांमध्ये उमेदवारीवरून झालेल्या वादाचे पर्यवसान चक्क 'एबी फॉर्म' गिळून खाऊन टाकण्यात झाले. एका उमेदवाराने आपल्या प्रतिस्पर्ध्याचा अधिकृत 'एबी फॉर्म' हिसकावून तो चक्क गिळून टाकल्याने निवडणूक केंद्रावर मोठी खळबळ उडाली. या नाट्यमय आणि संतापजनक घटनेमुळे राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, प्रभाग ३६ (अ) साठी शिवसेना शिंदे गटाकडून दोन उमेदवारांना एबी फॉर्म देण्यात आल्याने गोंधळ निर्माण झाला होता. बुधवारी सकाळी मच्छिंद्र ढवळे आणि उद्धव कांबळे यांच्यात यावरून जोरदार बाचाबाची झाली. ही वादावादी सुरू असतानाच, संतापलेल्या उद्धव कांबळे यांनी मच्छिंद्र ढवळे यांच्या हातातील पक्षाचा अधिकृत एबी फॉर्म हिसकावून घेतला आणि



तो फाडून थेट तोंडात टाकून गिळून टाकला.

उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या क्षणी घडलेल्या या धक्कादायक प्रकारामुळे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयाबाहेर कमालीचा तणाव निर्माण झाला होता. एकाच पक्षाच्या दोन कार्यकर्त्यांमधील हा टोकाचा अंतर्गत कलह पाहून उपस्थित नागरिक आणि इतर पक्षांचे उमेदवारही अवाक झाले. अखेर परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप केला आणि निवडणूक प्रक्रियेत गोंधळ घातल्याप्रकरणी तसेच सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी उद्धव कांबळे यांना ताब्यात घेतले. या घटनेमुळे धनकवडी-सहकारनगर परिसरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

निवडणुकीच्या ऐन धामधुमीत 'एबी फॉर्म' खाऊन टाकण्याच्या या विचित्र प्रकारामुळे स्थानिक पातळीवर शिवसेनेच्या प्रतिमेला मोठा तडा गेला असून राजकीय वर्तुळात यावर टीकेची झोड उठत आहे. उमेदवारीवरून उफाळलेला हा अंतर्गत वाद आता पोलिस ठाण्यापर्यंत पोहोचला असून, या गोंधळामुळे मच्छिंद्र ढवळे यांच्या उमेदवारीवर टांगती तलवार निर्माण झाली आहे. त्यांना निवडणूक आयोगाकडून किंवा पक्षाकडून नवीन फॉर्म उपलब्ध करून दिला जाणार की तांत्रिक कारणास्तव त्यांचा अर्ज अवैध ठरणार, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत स्पष्टता न मिळाल्याने कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.

## उमेदवारी डावलल्याने बंडेखारी भाजपच्या मनीषा माळोदे अपक्ष लढणार

### प्रभाग क्र. १४ मधील चित्र बदलले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१अमरावती**-भाजपने उमेदवारी डावलल्यामुळे मनिषा माळोदे यांनी प्रभागक्रं १४मधून अपक्ष लढण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे या प्रभागील राजकीय समिकरण बदलले आहे.जवाहर गेट बुधवारा प्रभाग क्र. १४ मध्ये ओबीसी महिला मनीषा मंगेश माळोदे यांनी भाजपाकडे उमेदवारी दाखल केली होती. मुलाखतीमध्ये पक्ष नेतृत्वाने त्यांना दिलेल्या आश्वासनाची परिपूर्ती झाली नाही. त्यामुळे प्रभागातील कार्यकर्ते व नागरिक यांच्या आग्रहास्तव मनीषा माळोदे यांनी अपक्ष उमेदवार म्हणून मनपा निवडणूक लढविण्याचा निर्धार व संकल्प एका बैठकीत व्यक्त केला. मनीषा माळोदे या अंबा महिला मोच्र्याच्या सरचिटणीस असून समाज सेविका म्हणून त्यांचे कार्य प्रभाग क्र. १४ मध्ये आहे. त्यांनी प्रभागात जन सुविधा व मूलभूत सोयी उपलब्ध होण्यासाठी अनेक वेळा निवेदने देऊन, उपोषणा द्वारे नागरिकांच्या समस्या सोडविल्या आहेत. महिला बचत गट आणि पक्षाच्या माध्यमातून त्यांनी अनेक लोकोपयोगी कामे केली असल्याची माहिती भाजप ओबीसी शहर मोर्चाचे संपर्क प्रमुख अॅड. प्रभाकर वानखडे यांनी दिली.


## सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर स्विप कार्यक्रमाचा आढावा

# सोशल मीडियाच्या माध्यमातून व्यापक मतदार जनजागृतीचे निर्देश

### अमरावती महानगरपालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौम्या शर्मा चांडक यांची बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती** आगामी सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ पारदर्शक, निर्भय व लोकसहभागा तून यशस्वीरीत्या पार पाडण्याच्या दृष्टीने अमरावती महानगरपालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौम्या शर्मा चांडक यांनी आज रोजी स्विप कार्यक्रमाबाबत सविस्तर आढावा बैठक घेतली. ही बैठक अमरावती महानगरपालिका मुख्यालयातील कॉन्फरन्स हॉल येथे पार पडली.या बैठकीत मतदार जनजागृतीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. निवडणूक प्रक्रियेत नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढविणे, मतदानाची टक्केवारी उंचावणे तसेच लोकशाही प्रक्रियेबाबत जनतेमध्ये विश्वास निर्माण करणे, हा स्विप कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौम्या शर्मा चांडक यांनी यावेळी स्पष्ट केले.बैठकीदरम्यान सौम्या शर्मा चांडक यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून व्यापक आणि प्रभावी जनजागृती करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. सध्याच्या डिजिटल युगात सोशल मीडियाचा प्रभाव लक्षात घेता फेसबुक, इन्स्टाग्राम, एक्स (ट्विटर), व्हॉट्सप, युट्यूब आदी माध्यमांचा योजनाबद्ध आणि सकारात्मक वापर करून



मतदारांपर्यंत निवडणूकविषयक माहिती पोहोचवावी, असे त्यांनी सांगितले.विशेषतः प्रथमच मतदान करणारे तरुण मतदार, महिला मतदार, दिव्यांग मतदार तसेच शहरी भागातील कामकाजात व्यस्त असलेले मतदार यांच्यापर्यंत पोहोचण्या साठी डिजिटल माध्यमांचा उपयोग प्रभावी ठरेल, असे त्यांनी नमूद केले.मतदार यादीत नाव नोंदणी, नाव दुरुस्ती, पत्ता बदल, मतदार ओळख पत्राशी संबंधित माहिती तसेच मतदान प्रक्रियेची सविस्तर माहिती नागरिकांपर्यंत सोप्या भाषेत पोहोचविण्यावर भर देण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. प्रत्येक पात्र नागरिकाने मतदानाचा हक्क बजावावा, यासाठी विविध जनजागृती उपक्रम, पोस्टर्स, व्हिडीओ, संदेश तसेच नाविन्यपूर्ण कल्पनांचा वापर करण्याचे निर्देश देण्यात आले.निवडणूक प्रक्रियेतील सर्व यंत्रणांनी आपापली जबाबदारी ओळखून समन्वयाने काम करावे, असे आवाहन आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौम्या शर्मा चांडक यांनी केले. स्विप कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी महानगरपालिकेचे विविध विभाग, शिक्षण संस्था, स्वयंसेवी संघटना व नागरिक यांचा सहभाग महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले.या आढावा बैठकीस अमरावती महानगरपालिकेतील विविध विभागांचे अधिकारी, निवडणूक शाखेतील कर्मचारी तसेच स्विप कार्यक्रमाशी संबंधित अधिकारी उपस्थित होते. बैठकीदरम्यान सर्वांनी आपापल्या सूचना व अनुभव मांडले.सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ यशस्वी करण्यासाठी प्रशासन सज्ज असून, मतदार जागृती ही लोकशाही बळकट करण्याची पहिली पायरी आहे, असा ठाम संदेश या बैठकीतून देण्यात आला.

## संघ मुख्यालयाच्या प्रभागात भाजपला धक्का:स्वयंसेवकाचा थेट संघर्ष

### राजकारणात तरुणांना संधी नसल्याने मैदानात- निनाद दीक्षित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१नागपूर**

नागपूर महानगरपालिकेतील प्रभाग क्रमांक २२ हा केवळ एक सर्वसामान्य प्रभाग नसून भाजपसाठी अत्यंत प्रतिष्ठेचा मानला जातो. कारण याच प्रभागात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय असून सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्यासह संघाचे अनेक वरिष्ठ पदाधिकारी येथे वास्तव्यास आहेत. त्यामुळे हा प्रभाग नेहमीच राजकीयदृष्ट्या संवेदनशील आणि महत्त्वाचा राहिला आहे. मात्र यंदाच्या महापालिका निवडणुकीत याच प्रभागातून भाजपला अनपेक्षित आव्हान उभं राहिलं असून, अवघ्या पंचवीस वर्षांचा तरुण स्वयंसेवक थेट सत्ताधारी भाजपच्या उमेदवारांविरोधात मैदानात उतरला आहे.

निनाद दीक्षित असं या तरुणाचं नाव असून, तो संघाचा स्वयंसेवक राहिलेला आहे. प्रभागातील भाजप नगरसेवकांनी गेल्या काही वर्षांत निष्क्रियता दाखवली, मूलभूत विकास कामांकडे दुर्लक्ष केलं आणि केवळ दिखाऊ कामांवर भर दिला, असा थेट आरोप करत निनाद दीक्षितने निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. त्याची उमेदवारी नागरिक समितीच्या माध्यमातून असून, तो नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या



फॉरवर्ड ब्लॉक पक्षाच्या चिन्हावर निवडणुकीच्या रिंगणात उतरला आहे. संघ मुख्यालय असलेल्या प्रभागात भाजपच्या विरोधात उभा राहणं ही बाब राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरली आहे.

निनाद दीक्षितच्या मते, प्रभाग २२ मध्ये केवळ गट्टू बसवणे, टाईल्स लावणे आणि सिमेंटचे रस्ते बांधणे एवढाच विकास झाला आहे. मात्र लोकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित प्रश्न, सार्वजनिक सुविधा, सामाजिक पायाभूत कामे आणि दीर्घकालीन विकास योजना याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आलं. संघाचे मुख्यालय असलेला हा प्रभागच जर दुर्लक्षित राहात असेल, तर इतर भागांची अवस्था काय असेल? असा सवाल तो उपस्थित करतो. भाजप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांनी नागपूरच्या जनतेला गृहीत धरल्याचा आरोपही तो करतो.

एका वृत्त वाहिनीशी संवाद साधताना निनाद दीक्षित म्हणाला की, प्रभागाच्या राजकीय परिस्थितीत आमूलाग्र बदल घडवण्याची गरज आहे. मात्र सध्या अस्तित्वात असलेले मोठे पक्ष हा बदल घडवू शकत नाहीत. तीन-चार टर्म नगरसेवक राहिलेले, साठ वर्षांचे नेते जर बाजूला सरकत नसतील, तर तरुणांना संधी कधी आणि कशी मिळणार? असा थेट सवाल त्याने उपस्थित केला. तरुणांनी केवळ प्रचारासाठी धावायचं, झेंडे उचलायचे आणि मतांसाठी वापरून घ्यायचं, पण निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घ्यायचं नाही, ही आजची राजकीय संस्कृती असल्याचं त्याचं म्हणणं आहे.

निनाद दीक्षितने आणखी एक गंभीर मुद्दा उपस्थित केला आहे. महाराष्ट्रात महाविद्यालयीन निवडणुका अनेक वर्षांपासून बंद आहेत. त्यामुळे तरुणांना राजकारणाची पहिली शाळा असलेला विद्यार्थी राजकारणाचा अनुभवच मिळत नाही. तरुणांनी जायचं तरी कुठे? राजकारणात प्रवेश कसा करायचा? असा प्रश्न तो विचारतो. याच पार्श्वभूमीवर, नागरिक समितीच्या माध्यमातून निवडणूक लढवणं हा तरुणांसाठी एक पर्यायी मार्ग असल्याचं तो सांगतो. व्यवस्थेत बदल घडवायचा असेल, तर किमान एका प्रभागातून तरी लढा उभारता येतो, आणि तोच लढा आम्ही देत आहोत, असं त्याचं ठाम मत आहे.

## १ उमेदवार तर दुसऱ्याचे 'कमळ' चिन्ह बाद

## प्रभाग १८ मध्ये २ पैकी दोनच उमेदवार कायम

### एका उमेदवाराचे एबी फॉर्म त्रुटीने चिन्ह गायब

### तर दुसऱ्याचा प्रॉपर्टी टॅक्स नो ड्यु नसल्याने अर्ज अवैध

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१अमरावती**

मंगळवारला एबी फॉर्म वाटप करताना भाजपला गोंधळाचा सामना करावा लागला. तर दुसऱ्या दिवशी उमेदवारी न मिळाल्याने संतप्त झालेल्या काही पदाधिकाऱ्यांनी भाजपच्या वरीष्ठ पदाधिकाऱ्यांना धारेवर धरत, धक्काबुक्की, बाचाबाची झाल्याने चांगलाच राडाझाला. त्यात आणखी भर म्हणजे प्रभाग १८ ड आणि १८ अमधून भाजपचे २ उमेदवारांना नामांकन छाननीचा फटका बसला. यांत एका उमेदवाराचा अर्जच अवैध ठरला, तरदुसऱ्या उमेदवाराच्याएबी फॉर्ममध्ये त्रुटी असल्याने कमळ चिन्ह मिळाले नाही. त्यामुळेराजापेठ प्रभागात आताचारपैकी दोन उमेदवार कमळ चिन्हावर निवडणूक लढवतील.

प्रभाग १६ राजापेठ श्रीसंतकंवररामधून भाजपने चेतन पवार, राजेश शादी, अपर्णा



ठाकरे आणि पद्मजा कौंडण्य यांना निवडणूक मैदानात उतरविले होते.यातील 'ड'मधील उमेदवार राजेश शादी यांच्या नामांकनावर समीर जंवजाळ यांना आक्षेप दाखल केला. यावर सुनावणी झाली असता त्यात प्रॉपर्टी टॅक्सनो ड्युनसल्याचे स्पष्ट झाल्याने त्यांचा उमेदवारी अर्जच बाद झाला.तर दुसऱ्या प्रकरणात 'अ' मधील अर्पणा अमोल कोल्हे यांच्या एबी फॉर्म बाबत आक्षेप घेण्यात आला. त्यांनी ३ वाजताची वेळ संपल्यानंतर एबी फॉर्म सायंकाळी ४ ते ५ वा. दरम्यान दिल्याचा आक्षेप प्रणाक्षी प्रणय मालविय (झांबानी) यांनी घेतला. यावर सुनावणी झाल्यानंतर मुदतीनंतर एबी फॉर्म दिल्याचे स्पष्ट झाल्याने अपर्णा अमोल ठाकरे यांचा एबी फॉर्म रद्द झाल्याने त्यांना कमळ चिन्हावर निवडणूक लढविता येणार नाही. त्यामुळे अपर्णा ठाकरे या अपक्ष म्हणून रिंगणात कायम राहतील.

# मागण्यांकडे दुर्लक्ष; तलाठ्यांचे आंदोलन:

## विदर्भ संघाचे धरणे; ६ जानेवारीपासून बेमुदत रजा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१यवतमाळ**-जिल्हा प्रशासनाच्या दुर्लक्षित व आडमुठ्य धोरणामुळे यवतमाळ जिल्ह्यातील ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) संवर्गामध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. आपल्या प्रलंबित व न्याय्य मागण्यांसाठी विदर्भ पटवारी संघाच्या वतीने बुधवारी, ३१ डिसेंबर रोजी जिल्ह्यातील सर्व तहसील कार्यालयांसमोर एक दिवसीय लक्षवेधी धरणे आंदोलन करण्यात आले. जिल्ह्यातील ग्राम महसूल अधिकारी संवर्गाच्या आर्थिक व सेवाविषयक मागण्यांबाबत आतापर्यंत १० ते १२ निवेदने सादर करण्यात आली आहेत. तलाठी संवर्गाची एकत्रित सेवाज्येष्ठता यादी गेल्या १५ वर्षांपासून अद्यावत करण्यात आलेली नाही. तसेच मंडळ अधिकारी पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या तलाठ्यांना पदोन्नती देण्यात यावी, अशी मागणी आहे. कालबाह्य झालेले लॅपटॉप व प्रिंटर बदलून देणे, वेतन निश्चिती करण्यात यावी, सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधीचा अतिरिक्त प्रभार देऊ नये. आदिवासी प्रोत्साहनपर भत्ता मंजूर करावा, अशा विविध मागण्यांचाही समावेश आहे. या सर्व मागण्यांचे सविस्तर निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी यांना देण्यात आले. यावेळी विदर्भ पटवारी संघाचे जिल्हाध्यक्ष भरत पिसे, सचिव चेतन ठाकरे, परिमल डोळसकर, सुनील उराडे, प्रकाश कानडे यांच्यासह मोठ्या संख्येने तलाठी उपस्थित होते. प्रशासनानी दखल घ्यावी आंदोलनाचा भाग म्हणून जिल्ह्यातील सर्व तलाठ्यांनी डू-डीएससी टोकन्स प्रशासनाकडे जमा केली. प्रशासनाने यापुढेही केवळ आश्वासनांचीच भूमिका घेतल्यास ६ जानेवारीपासून बेमुदत रजा आंदोलन छेडण्यात येईल, असा ठाम इशारा विदर्भ पटवारी संघाने दिला आहे.



# वर्षाअखेर 'श्री'च्या दर्शनासाठी ८० हजार भाविक : गत वर्षीपेक्षा ४० हजारांनी वाढ

## नववर्षाच्या सुरुवातीला शेगावात लाखो भक्तांची गर्दी



विदर्भ प्रजासत्ताक
दि.१शेगाव

चला शेगावासी जाऊ।
गजानन संता पाहू ।
संत म्हणता होतील भेटी ।
आनंदी नाचे संतनगरी ।।
हे भक्तांचे माहेर ।
सर्व सुखाचे भांडार ।।

भक्तांचे माहेर, सर्व सुखाचे भांडार असलेल्या शेगावात श्रींच्या समाधी दर्शनाने नवीन वर्षाची सुरुवात असंख्य भाविक भक्तांनी श्रींच्या चरणी नतमस्तक होऊन आपल्या नवीन वर्षाची सुरुवात श्रींच्या आशीर्वादाने करण्याचे ठरवले आहे. त्यानुसार सरत्या वर्षाला निरोप देत नववर्षाचे स्वागत व संत गजानन महाराजांचा आशीर्वाद घेण्यासाठी शेगावात सुमारे ८० हजाराच्या जवळपास भाविक शेगावात दाखल होते. नव वर्षाच्या सुरुवात होइपर्यंत ही संख्या लाखोंच्या जवळपास जाण्याची शक्यता आहे.

राज्यातील कानाकोपऱ्यातून हजारो भाविकांनी नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी व नवीन वर्षाची सुरुवात श्री संत गजानन महाराजांच्या दर्शनाने करण्याच्या उद्देशाने श्री संत गजानन महाराज मंदिर मध्ये दर्शन घेण्यासाठी गर्दी करणे सुरू केले आहे. उद्या १ जानेवारी रोजी एक ते दोन लाखाच्या वर भाविक शेगावात येऊन श्रींच्या मंदिरात श्रींच्या समाधीचे मनोभावे दर्शन व नवीन वर्षाचे स्वागत श्री संत गजानन महाराजांच्या श्री चरणात नतमस्तक होऊन श्रींचे दर्शन घेतील.

पस्तीस हजार भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ यानंतर ३५ हजार च्या जवळपास भाविकांनी श्रींच्या महाप्रसादाचा सुद्धा लाभ घेतला.श्री मंदिर परिसरात झालेल्या गर्दीमुळे कोणत्याही भाविकांना श्रींचे दर्शन घेण्यास असुविधा होऊ नये व त्यांना योग्य प्रकारे श्रींचे दर्शन घेता यावे याकरिता मंदिर परिसरात ठिकठिकाणी शेकडो सेवाधारी वर्गाने आपली सेवा देत आहेत. भाविक भक्तांचे वाहनांसाठी श्री गजानन महाराज संस्थानचे नि:शुल्क वाहन पार्किंगचा लाभ भक्त घेत आहेत.

दशमीच्या दिवशी श्रींच्या पालखीची आज मंदिर परिक्रमा गुरुवार व दशमीच्या दिवशी श्रींच्या पालखीची मंदिर परिक्रमा निघत असते. दि. ३० डिसेंबर रोजी दशमी असल्याने श्रींच्या पालखीची मंदिर परिक्रमा निघाली तर दि. ३१ डिसेंबर बुधवार रोजी पुत्रदा भागवत एकादशी आहे. १ जानेवारी २०२६ रोजी गुरुवार आल्याने वर्षाच्या पहिल्याच दिवशी श्रींच्या पालखीची मंदिर परिक्रमा निघणार असल्याने श्रींच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना श्रींच्या पालखीचे दर्शन मिळणार आहे. एकादशी व गुरुवार या दोन दिवशी हजारो भाविक शेगावची वारी करत असतात.

गुरुवारनिमित्त निघणार पालखी आजचे एकादशी कीर्तन सोपानबुवा काळपांडे, मु. जोडजवळा जि. अमरावती, उद्याचे गुरुवार कीर्तन मोहनबुवा गोंडचवर मु. खरप जि. अकोला आजचे सकाळी ४ ते रात्री १२ पर्यंत ८० हजार श्री भक्तांनी दर्शन घेतले. आज सकाळी १० ते सायंकाळी ५ पर्यंत ३५ हजार भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. उद्या गुरुवार निमित्त नेहमीप्रमाणे पालखी निघेल. ३१ डिसेंबर निमित्त श्रींच्या दर्शनार्थी भक्तांकरिता मंदिर रात्रभर खुले होते.

# अमरावती शहर गुन्हेशाखेची १२ तासांत मोठी कामगिरी

## जबरी चोरी प्रकरण उघड, ३ विधी संघर्षीत बालक ताब्यात

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१अमरावती

अमरावती शहरात घडलेल्या जबरी चोरीच्या घटनेचा छडा अवघ्या १२ तासांत लावत अमरावती शहर गुन्हेशाखेने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या प्रकरणात ०३ विधी संघर्षीत बालकांना ताब्यात घेण्यात येऊन गुन्ह्यातील मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.मा. पोलीस आयुक्त अमरावती शहर यांनी शहरातील जबरी चोरीचे गुन्हे तात्काळ उघडकीस आणण्याबाबत स्पष्ट आदेश दिले होते. त्या अनुषंगाने





पोलीस निरीक्षक श्री. संदीप चव्हाण, गुन्हे शाखा अमरावती शहर यांच्या नेतृत्वाखाली पोलीस अधिकारी व अंमलदारांच्या पथकाने गुप्त बातमीदार नेमून तपासाची चक्रे वेगाने फिरवली.पोलीस स्टेशन बडनेरा येथे दिनांक ३० डिसेंबर २०२५ रोजी फिर्यादी शेख जाबीर शेख अब्दुल्ला (वय ३६, रा. चपराशीपुरा, अमरावती) यांनी तक्रार दाखल केली होती. तक्रारीनुसार, बडनेरा येथून अमरावतीकडे येत असताना कोंडेश्वर टी-पॉईंट समोरील प्रखर पेट्रोल पंपाजवळ स्प्लेंडर मोटारसायकलवरून आलेल्या चार अज्ञात इसमांनी त्यांना हात दाखवून थांबवले. त्यानंतर मारहाण करून जबरदस्तीने त्यांच्याकडील १२,५०० रुपये रोख रक्कम हिसकावून आरोपी पसार झाले.या तक्रारीवरून पोलीस स्टेशन बडनेरा येथे गुन्हा दाखल करण्यात आला.गुन्ह्याचा समांतर तपास सुरू असतानाच गुन्हे शाखेला गुप्त बातमीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाली. त्या माहितीच्या आधारे महादेव खोरी परिसरातून ०३ विधी संघर्षीत बालकांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेली एक मोटारसायकल व रोख रक्कम असा एकूण ४०,४७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



# अमरावती जिल्ह्यात दुष्काळसदृश स्थितीवर शिक्कामोर्तब

## अंतिम पैसेवारी ४७ जाहीर, १९३९ गावांमध्ये ५० पेक्षा कमी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१ अमरावती

अमरावती जिल्ह्यात शेतीपिकांची स्थिती दर्शवणारी अंतिम पैसेवारी बुधवारी, ३१ डिसेंबर रोजी जाहीर करण्यात आली. जिल्ह्याची सरासरी पैसेवारी ४७ असून, ती ५० पेक्षा कमी असल्याने प्रशासनाने दुष्काळसदृश स्थितीवर शिक्कामोर्तब केले आहे.

जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली महसूलचे उपजिल्हाधिकारी विवेक जाधव यांनी शेतीपिकांचा अंतिम अहवाल सादर केला. या अहवालानुसार, जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यातील २००४ पैकी शेतीपिकांची लागवड झालेल्या १९७३ गावांचे सर्वेक्षण केले.

या सर्वेक्षणात १९७३ पैकी १९३९ गावांमध्ये शेतीपिकांची स्थिती असामान्य आढळली. गतकाळातील अतिवृष्टी, पूरस्थिती आणि सततच्या पावसामुळे या गावांमध्ये शेतीपिकांची उत्पादकता घटली आहे. केवळ ३४ गावांमध्ये शेतीपिकांची स्थिती समाधानकारक असल्याने तेथील पैसेवारी ५० पेक्षा अधिक आहे.

या अहवालानुसार, धारणी तालुक्यातील १५२ पैकी केवळ ३४ गावांमध्ये शेतीपिकांची स्थिती बरी आहे. धारणी तालुका वगळता जिल्ह्यातील उर्वरित १३ तालुक्यांमधील सर्व लागवडयोग्य गावांमध्ये शेतीपिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

तालुकानिहाय पैसेवारी पाहता, तिवसा तालुक्याची पैसेवारी सर्वात कमी ४३ आहे. मेळघाटातील धारणी, चिखलदरा आणि नांदगाव खंडेश्वर तालुक्यांची पैसेवारी सर्वाधिक ४९ आहे. वरुड, दर्यापूर आणि धामणगाव रेल्वे तालुक्यात ४८, तर भातकुली, चांदूर रेल्वे, मोर्शी, चांदूर बाजार आणि अंजनगाव सुर्जी तालुक्यांची पैसेवारी ४७ आहे. अमरावती आणि अचलपूर तालुक्याची पैसेवारी ४६ वर थांबली आहे.

अंतिम पैसेवारी घोषित करण्यापूर्वी तीन महिन्यांपूर्वी जिल्ह्याची नजरअंदाज पैसेवारी ५६ वर स्थिरावली होती. त्यावेळी चांदूर बाजार आणि वरुड तालुक्याची पैसेवारी सर्वाधिक ६१ होती, तर धारणी तालुक्याची पैसेवारी सर्वात कमी ५२ होती.

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक
जाहिरात आणि बातम्यांसाठी
संपर्क करा 8605948853

# अमरावतीच्या बेलोरा विमानतळावर एफटीओ एप्रिलमध्ये सुरू होणार



विदर्भ प्रजासत्ताक
दि.१अमरावती

दक्षिण आशियातील सर्वात मोठी वैमानिक प्रशिक्षण ऑर्गनायझेशन (एफटीओ) एप्रिल २०२६ पासून अमरावतीच्या बेलोरा विमानतळावर सुरू होणार असून, एअर इंडिया या एफटीओचे संचालन करीत आहे. येथे एकूण ३४ प्रशिक्षण देणारी विमाने उपलब्ध राहतील. त्यात तीन दुहेरी इंजिन तर ३१ विमाने एका इंजिनची राहतील. येथे वर्षाच्या पहिल्या सत्रात १८० वैमानिकांना प्रशिक्षण देण्याची सोय केली जात आहे. हे प्रशिक्षण २ वर्षांचे असून, दरवर्षी एवढ्याच वैमानिकांना येथे प्रशिक्षित केले जाणार आहे.

२०२८ मध्ये वैमानिकांची पहिली तुकडी तयार होईल. त्यामुळे वैमानिकाचे प्रशिक्षण घेणाऱ्यांसाठी निवास व्यवस्था, थेअरी तसेच प्रत्यक्ष विमानोड्डानाची सोय केली जात आहे. प्रशिक्षणार्थींना येथे तज्ज्ञ वैमानिकांच्या मार्गदर्शनात विमानोड्डानाचा अनुभव दिला जाणार आहे. दोन दुहेरी इंजिन असलेली प्रशिक्षण विमाने अमेरिकेहून (युएसए) नुकतीच बेलोरा विमानतळावर दाखल झाली. त्याचप्रमाणे १३ सिंगल इंजिन असलेली विमाने सध्या नागपुरातील आंतरराष्ट्रीय विमानतळावर आहेत. सोयीनुसार ती अमरावतीत आणली जाणार आहेत. या विमानांमधून प्रत्यक्ष विमानोड्डानाचा अनुभव प्रशिक्षनार्थी वैमानिकांना दिला जाईल. यासाठी वेगाने एफटीओच्या इमारतीचे काम पूर्ण केले जात असल्याची माहिती एफटीओचे व्यवस्थापक रवीतेजा शर्मा यांनी दिली. बेलोरा विमानतळ हे शहरापासून १५.५ कि.मी.अंतरावर असून, येथे एफटीओ सुरू झाल्यानंतर विकासालाही हातभार लागणार आहे.

दुहेरी व एकेरी इंजिन असलेली विमाने युएसएहून मागवण्याचे कारण या विमानांमध्ये वैमानिकाचे प्रशिक्षण घेणाऱ्या शिकाऊ वैमानिकांसाठी विशेष सुविधा देण्यात आल्या आहेत. तसेच ते वजनानेही हलके असते. त्यामुळे त्याचे टेकऑफ व लॅण्डिंग करणे शिकाऊ वैमानिकांसाठी सुलभ असते. विमानांमधील या वैशिष्ट्यांमुळेच ती युएसएहून मागवण्यात आली आहेत. प्रथम प्रशिक्षणार्थींना सिंगल इंजिन असलेल्या विमानांमध्ये उड्डाणाचे प्रशिक्षण दिले जाईल.

# काचेचा स्कायवॉक उन्हाळ्यात होईल पूर्ण

## चिखलदऱ्यातील ४०७ मीटर लांबीच्या स्कायवॉकमध्ये ८० मीटर राहणार काच

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१चिखलदरा



अमरावती विदर्भाचे नंदनवन असलेल्या चिखलदऱ्यात मागील ४ ते ५ वर्षांपासून देशातील पहिल्या काचेच्या स्कायवॉकचे काम सुरू झाले आहे. ४०७ मीटर लांबीचा असलेल्या या स्कायवॉकचे काम एप्रिल, मे २०२६ पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता सिडकोच्या अधिकाऱ्यांनी वर्तवली आहे. स्काय वॉकचे काम पूर्ण झाल्यानंतर पर्यटकांसाठी तो खुला करण्यापूर्वी वनविभागाकडून एक परवानगी सिडकोला घेणे अत्यावश्यक आहे, ती मिळाल्यास येत्या उन्हाळ्यातच पर्यटकांना काचेच्या स्कायवॉकवरुन अभूतपूर्व निसर्गथरार अनुभवता येणार आहे. या स्कायवॉकची जमिनीपासून उंची शंभर ते दोनशे नव्हे तर तब्बल १,५०० फूट आहे. हा भारतातील सर्वात जास्त लांबीचा स्कायवॉक असून, त्याचे विशेष म्हणजे दरीच्या मध्यभागी किंवा ज्या ठिकाणाहून दरी व निसर्ग अधिक उत्तमपणे अनुभवता येईल, अशा ठिकाणी ८० मीटर पारदर्शक काच बसवण्यात येणार आहे. काच असलेला देशातील हा पहिला स्कायवॉक राहणार आहे. उर्वरित पान ४ अमरावती झपाट्याने काम सुरू आता आवश्यक सर्व परवानगी व विंड टनेल टेस्टचा रिपोर्ट प्राप्त झाला आहे. त्यामुळे झपाट्याने काम सुरू झाले असून, एप्रिल ते मे २०२६ पर्यंत काम पूर्ण होणे अपेक्षित आहे. काम पूर्ण झाल्यानंतर स्कायवॉक पर्यटकांसाठी खुला करण्यापूर्वी केंद्रीय वन विभागाकडून एक परवानगी मिळवणे आवश्यक आहे. ती परवानगी प्राप्त होताच हा स्कायवॉक पर्यटकांसाठी खुला होणार आहे. - अक्षय महल्ले, प्रभारी कार्यकारी अभियंता, सिडको, चिखलदरा. चाचण्या, परवानग्यामुळे रखडले होते काम स्कायवॉकचे प्रत्यक्षात काम ५ वर्षांपूर्वी सुरू होते, सिव्हील वर्क अर्ध्यापेक्षा अधिक झाले असतानाच वन विभागाच्या तसेच इतर विभागांकडून काही परवानग्या सिडकोला घ्याव्या लागल्यात. याच दरम्यान गुजरातमधील पूल दुर्घटना झाली. नंतर या पुलाच्या बांधकामादरम्यान विन्ड टनेल टेस्ट करण्याच्या सूचना आल्या. रुडकी व अन्य एका ठिकाणच्या 'आयआयटी' तज्ज्ञांना पाचारण करून या ठिकाणी विंड टनेल टेस्ट करण्यात आली. विविध परवानग्या व विंड टनेल टेस्टचा रिपोर्ट चार महिन्यांपूर्वी प्राप्त झाला. पुन्हा झपाट्याने काम सुरू झाले.

# येवदा परिसरात वाघ दिसल्याची चर्चा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१ येवदा

येवदा शिवारात वाघ दिसल्याची चर्चा सध्या जोर धरत आहे. या अफवेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सध्या कापूस वेचणीचा हंगाम सुरू आहे. शेतमजूर शेतात जाण्यास तयार नसल्याने शेतकऱ्यांपुढे मोठे संकट उभे राहिले आहे. मंगळवारी (दि. ३०) येवदा येथील भागळी परिसरातील मुजम्मिल जमादार व रमेश गायधने यांच्या शेतात सकाळच्या सुमारास कापूस वेचणीसाठी मजूर गेला होता. त्यावेळी एका शेतात वाघ दिसल्याचे एक मजुराने म्हटल्याने त्या भागातील सर्व शेतात काम करणाऱ्या मजुरांनी शेतातून काढता पाय घेतला. मजूर परत आल्याने सर्व येवदा परिसरात वाघ आल्याची अफवा हवेसारखी पसरली. गेल्या २-३ दिवसांपासून येवदा परिसरात वाघ दिसल्याच्या अफवेमुळे उलटसुलट चर्चांना उधान आले आहे. त्यातच एका शेतात हरिणाचे पिल्लू व दुसऱ्या



शेतात जंगली डुक्कर डुक्कर मृतावस्थेत आढळून आल्याने आणखीच गोंधळ निर्माण झाला आहे. या चर्चेमुळे शेतमजूर शेतात जाण्यास नकार देत आहेत. त्यामुळे तयार कापूस शेतातच राहिला असून, उत्पादनावर परिणाम होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. या घटनेची

माहिती वनविभागाला देण्यात आली. वनविभागाच्या पथकाने सागाकडून स्पष्ट सदर शेतात पोहोचून सर्व परिसर पिंजून काढला. परंतु, वाघ किंवा बिबट्याचा वावर असल्याचे कुठलेही ठोस पुरावे आढळून आले नसल्याचे वनविभागाकडून करण्यात आले. त्यामुळे नागरिकांना घाबरून न जाण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. मात्र, खबरदारी म्हणून शेतकऱ्यांनी गटागटाने शेतात जावे. रात्रीच्या वेळी शेतात जाणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

**वाघाच्या पायाचे ठसे, इतर पुरावे आढळून आले नाहीत**

परिसराची सखोल पाहणी करण्यात आली. मृत सापडलेल्या प्राण्यांची सुद्धा वैद्यकीय तपासणी करण्यात आली. परंतु ह्या शिकार वाघाने किंवा बिबट्याने केल्या नसल्याचे निदर्शनात आले. तसेच वाघाच्या पायाचे ठसे किंवा इतर पुरावे आढळून आले नाहीत. पुढील तपास सुरू आहे. अशी माहिती दिनेश वाळके, वनपरिक्षेत्र अधिकारी, परतवाडा यांनी दिली.

# अचलपूर शहरातील गोरगरिबांना घरकुलापासून वंचित ठेवल्याचा आरोप

## आरपीआयकडून तीव्र आंदोलनाचा इशारा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१अचलपूर



अचलपूर शहरातील गोरगरीब नागरिक व २०११ पूर्वीचे नजुलधारक यांना शासनाच्या स्पष्ट परिपत्रकानुसार पी. आर. कार्ड तसेच विविध घरकुल योजनांचा लाभ मिळणे अपेक्षित असताना तो अद्याप मिळालेला नाही. अचलपूर नगर परिषदेचे संबंधित अधिकारी व सर्वेक्षणाची जबाबदारी असलेल्या पीएमसी (झचउ) संस्थेने चुकीचा व पक्षपाती सर्वे करून अनेक गरजू नागरिकांना घरकुल योजनेपासून वंचित ठेवल्याचा गंभीर आरोप रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया अचलपूर चे शहराध्यक्ष किशोर मोहोड यांनी केला आहे.शासन निर्णयानुसार २०११ पूर्वीचे सर्व नजुलधारक पात्र असतानाही त्यांना पी. आर.कार्ड न देता नवीन व अपात्र धारकांना लाभ देण्यात आल्याचे चित्र समोर येत आहे. त्यामुळे अनेक गरीब, कष्टकरी कुटुंबे आजही घरकुलाच्या प्रतीक्षेत आहेत. पंतप्रधान आवास योजना, रमाई आवास योजना तसेच आदिवासी बांधवांसाठी असलेल्या शबरी आवास योजनेचा लाभ खऱ्या पात्र लाभार्थ्यांना मिळत नसल्याने तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.याबाबत नगरपालिकेने कोणताही भेदभाव न करता, निपक्षपाती व पारदर्शक पद्धतीने सर्व नवीन व जुन्या धारकांचा फेरसर्वे करून पात्र नागरिकांना पी. आर.कार्ड देण्यात यावे व घरकुल योजनांचा लाभ तातडीने मंजूर करण्यात यावा, अशी ठाम मागणी आरपीआय चे शहराध्यक्ष किशोर मोहोड यांच्या वतीने करण्यात आली आहे.जर प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन योग्य निर्णय घेतला नाही, तर अचलपूर शहरातील गोरगरिबांना न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया अचलपूर शहराच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा शहराध्यक्ष किशोर मोहोड यांनी दिला आहे.

# मेघा तेलखडे यांना आचार्य पदवी

विदर्भ प्रजासत्ताक दि.१अमरावती



विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीद्वारे संचालित इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय येथील सहअर्थशास्त्र विभागातील संशोधक विद्यार्थीनी मेघा ज्ञानेश्वर तेलखडे यांना नुकतीच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाद्वारे आचार्य पदवी (पीएच.डी) प्रदान करण्यात आली. त्यांनी डॉ. प्रा. लीना कांडलकर यांच्या मार्गदर्शनात 'नवीन इलेकट्रॉनिक प्रसार माध्यमांचा किशोरवयीन मुलांच्या शैक्षणिक व भाषा विकासावर होणारा परिणाम', या विषयावर आपला प्रबंध सादर केला होता. त्यांनी आपल्या यशाचे श्रेय मार्गदर्शक डॉ. प्रा. कांडलकर, इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय कोल्हे, संशोधक केंद्र प्रमुख प्रा. डॉ. सीमा अढाऊ, प्रा. डॉ. पुनम चौधरी तसेच आई मिनाक्षी, वडील ज्ञानेश्वर, भाऊ आकाश, वहिनी नेहा, भाची नुरवी, मैत्रिणी प्रा. डॉ. कल्पना गावंडे, प्रा. डॉ. सोनाली धांडे, प्रा. प्रियंका चौधरी यांना दिले आहे. मेघाला आप्तस्वकीय, मित्र परिवाराचे सहकार्य लाभले. तिचे सर्वच स्तरातून अभिनंदन होत आहे.





# साईनगर प्रभाग १९ वाय.एस.पी.चे सचिन भेंडे यांची उमेदवारी कायम

## भाजप न्यायालयात जाणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

अमरावती महानगरपालिका निवडणुकीतील प्रभाग क्रमांक १९ ड मध्ये युवा स्वाभिमान पार्टीचे उमेदवार सचिन भेंडे यांची उमेदवारी अखेर कायम ठेवण्यात आली आहे. भाजपकडून दाखल करण्यात आलेला आक्षेप निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी फेटाळल्याने या प्रभागातील राजकीय वातावरण अधिक तापले आहे.साईनगर येथील प्रभाग क्रमांक १९ मधून भाजपचे उमेदवार तुषार भारतीय यांनी सचिन भेंडे यांच्या उमेदवारीवर आक्षेप नोंदवला होता. सचिन भेंडे हे अमरावती महानगरपालिकेचे कंत्राटदार असल्याने त्यांची उमेदवारी अपात्र ठरवावी, असा युक्तिवाद भाजपकडून करण्यात आला होता.या प्रकरणी निवडणूक अधिकाऱ्यांसमोर दोन्ही बाजूंकडून जोरदार युक्तिवाद झाला. भाजपचे उमेदवार तुषार भारतीय





यांच्या वतीने तीन वकिलांनी, तर सचिन भेंडे यांच्या वतीनेही तीन वकिलांच्या चमूने कायदेशीर बाजू मांडली. सर्व बाबींचा विचार करून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सचिन भेंडे यांची उमेदवारी वैध ठरवली.या निर्णयावर प्रतिक्रिया देताना भाजपचे उमेदवार तुषार भारतीय यांनी, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निर्णयाच्या विरोधात आम्ही न्यायालयात जाणार आहोत, असे स्पष्ट केले.दरम्यान, युवा स्वाभिमान संघटनेचे नेते आमदार रवी राणा यांनी या निर्णयाचे स्वागत करताना, ही लोकहिताच्या लढाईतील जनतेचा विजय आहे, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.उल्लेखनीय म्हणजे, प्रभाग क्रमांक १९ ड मधून युवा स्वाभिमान पार्टीकडून सचिन भेंडे यांनी अधिकृत उमेदवारी दाखल केली असून, त्याच प्रभागातून भाजपकडून तुषार भारतीय हे निवडणूक रिंगणात आहेत. उमेदवारी कायम राहिल्याने या प्रभागातील लढत आता अधिक चुरशीची होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.या प्रकरणावर बडनेरा झोन कार्यालयावर रात्री उशिरापर्यंत सुनावणी सुरु होती. यावेळी सचिन भेंडे यांच्याकडून अ‍ॅड. दिप मिश्रा, अ‍ॅड. आशिष लांडे, अ‍ॅड. धनंजय तर तुषार भारतीय यांच्याकडून अ‍ॅड. मिलिंद वैष्णव, अ‍ॅड. श्रेयस वैष्णव, अ‍ॅड. रुपेश सवई आदींचा फौजफाटा हजर होता. शेवटी निवडणूक विभागाने सचिन भेंडे यांच्या बाजुने निर्णय देत त्यांचा अर्ज वैध ठरविला.

# शहरात नववर्षाचे जल्लोषात स्वागत

## फटाक्यांच्या आतिषबाजीने आकाश उजळले

### शहरात पोलिसांचा चोख बंदोबस्त; सीपी राकेश ओला ऑन रोड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

सरत्या २०२५ वर्षाला निरोप देत अमरावती शहरासह जिल्ह्यात सर्वत्र मोठ्या उत्साहाने नववर्षाचे स्वागत करण्यात आले. शहरातील प्रमुख चौकात तसेच विविध भागात युवकांनी ठिक १२ वाजताचा ठोका पडताच फटाक्यांची आतषबाजी करून नववर्षाचे जल्लोषात स्वागत करण्यात आला. शहरातील राजकमल चौकात तरुणाचा जल्लोष बघण्यासारखा होता. या ठिकाणी युवकांनी फटाक्याची आतषबाजी करीत नववर्षाचे स्वागत केले. तर अनेक ठिकाणी आकाश दिवे सोडून नव्या वर्षाचे स्वागत करण्यात आले.नववर्षाचे स्वागत करण्या साठी रस्ती, होती. चौकाचौकात, रस्तो-गल्लोगल्लीतरुणाई जमली अनेकठिकाणी फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. तर काही ठिकाणी डिजेच्या तालावर ठेका धरत नववर्षाचे स्वागत करण्यात आले.



**रात्री उशिरापर्यंत हॉटेल्स, बार, रेस्टॉरंट सुरु**

एकीकडे फटाक्यांची आतषबाजी करून नववर्षाचे स्वागताची तयारी सुरु असताना दुसरीकडे रात्री १० वा. पासून शहरातील हॉटेल्स, बार आणिरेस्टॉरंट फुल्ल होण्यास सुरुवात झाली होती. थर्टी फस्टच्या निमित्ताने पहाटे पाच वाजेपर्यंत बिनधास्त ड्रींक करण्याची परवानगी असल्यामुळे शहरातील सर्वच भागातील हॉटेल्स, बार, रेस्टॉरंट रात्री उशिरापर्यंत हाऊसफुल्ल सुरु होते. घड्याळात १२ वाजताच शहर पाहण्यासारखे होते. हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि मोकळ्या मैदानांवर दिवे लावण्यात आले होते, तरुणांनी मोठ्या उत्साहात नवीन वर्षाचे स्वागत केले. काहींनी केक कापले, तर काहींनी मित्रांसोबत किटी पार्टी करून, सुरेल संगीतावर नाचून उत्सव साजरा केला. लोकांनी हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि घरांमध्येही नवीन वर्ष साजरे केले. गोड गोड आठवणींच्या मिश्रणात, बुधवारी शहर उत्साहाने भरले होते, २०२५ ला निरोप देतपोलिस आयुक्त राकेश ओला स्वतः रस्त्यावर होते, त्यांनी कडक सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला. त्यांनी अधिकाऱ्यांशी भेट घेतली आणि सूचना दिल्या. शहरात नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. रस्त्यांपासून ते रेल्वे स्टेशन, बस स्टँड, क्लब आणि कार्यक्रम स्थळांपर्यंत प्रत्येक कोपऱ्यावर पोलिस सतर्क होते. नवीन वर्षाचे उत्सव कायद्याच्या चौकटीतच साजरा केला पाहिजे असा स्पष्ट संदेश शहर पोलिसांनी दिला होता. रस्त्यावरील त्रासदायक घटनांशी पोलिस कडकपणे वागताना दिसत होते. राजकमलचौक, इर्विनचौक, पंचवटी चौक, शेगावनाका, राजापेठ चौक आणि इतर चौकांवर सुरक्षा व्यवस्थेचाआढावा घेताना सीपी राकेश ओला दिसले.

### ड्रिंक अँड ड्राईव्हवर कडक कारवाई

नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला संपूर्ण शहरात सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्यात आली होती. रेल्वे पोलिस सीसीटीव्ही कॅमेऱ्याद्वारे रेल्वे स्थानके आणि प्रमुख सार्वजनिक ठिकाणी देखरेख करताना दिसले. दरम्यान, वाहतूक पोलिसांनीविशेष मोहीम सुरूकेली आणिमद्यपान करून गाडी चालवण्याच्या प्रकरणांवर कडक कारवाई केली. पोलिसांनी शहरात एकूण ३९ चौक्या उभारल्या, तर वाहतूक पोलिसांनी अंदाजे ५० ठिकाणी स्वतंत्र चौक्याही उभारल्या. श्वास विश्लेषकचा वापर क रून वाहनचालकांची तपासणी करण्यात आली आणि मद्यपान करून गाडी चालवणाऱ्यांवर ऑनस्पॉट कारवाई करण्यात आली. नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला सायंकाळी ५ ते पहाटे २ वाजेपर्यंत पोलिसांनी शहरातील रस्त्यांवर गस्त घातली.

# भोंग्यांवर प्रचार पडणार महागात

## नियमभंग केल्यास जाणार कठोर कारवाई

### वेळ व आवाजाची मर्यादा पाळा; पोलिस व निवडणूक निर्णय अधिकारी ठेवणार कडक नजर




**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

बहुप्रतीक्षेनंतर अमरावती महानगरपालिकेच्या निवडणुकीची घोषणा झाली असून शहरातील राजकीय वातावरण तापू लागले आहे. १७ जानेवारी रोजी मतदान तर १८ जानेवारीला निकाल जाहीर होणार आहे. नगरसेवक पदासाठी इच्छुक उमेदवारांनी नामनिर्देशन अर्ज दाखल केल्यानंतर प्रचाराला वेग येण्याची चिन्हे दिसत आहेत. मात्र, निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन न केल्यास उमेदवारांवर कठोर कारवाई होणार असल्याचा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. त्यामुळे प्रचार करताना उमेदवारांना अनेक निर्बंधांचे पालन करणे बंधनकारक आहे. विशेषतः ध्वनिक्षेपकांचा वापर, भोंगे लावून फिरती वाहने, प्रचारसभा व मिरवणुका याबाबत ठरावीक नियम लागू करण्यात आले आहेत. निवडणूक काळात तीनचाकी व चारचाकी वाहनांवर भोंगे लावून प्रचार करण्याकडे उमेदवारांचा कल अधिक असतो. मात्र, यासाठी पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असून आवाजाची व वेळेची मर्यादा ओलांडल्यास थेट कारवाई केली जाणार आहे.ध्वनिप्रदूषण रोखण्यासाठी रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत ध्वनिक्षेपक वापरण्यास संपूर्ण बंदी घालण्यात आली आहे. या कालावधीत कोणत्याही प्रकारचा भोंगा, लाऊडस्पीकर किंवा ध्वनिक्षेपक वापरता येणार नाही. तसेच, दिवसा वापर करतानाही ठरवून दिलेल्या डेसिबल मर्यादेचे पालन करणे बंधनकारक आहे. सभास्थळ किंवा प्रचाराच्या परिसरात आवाजाची पातळी नियंत्रित ठेवणे उमेदवारांची जबाबदारी असेल.प्रचारसभा, मिरवणूक किंवा फिरत्या वाहनावर ध्वनिक्षेपक वापरण्यापूर्वी संबंधित पोलिस ठाणे तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून रीतसर लेखी परवानगी घेणे अनिवार्य आहे. परवानगीशिवाय भोंगे लावून प्रचार केल्यास तो थेट नियमभंग मानला जाणार आहे. प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर तात्काळ गुन्हा दाखल करून कारवाई केली जाईल.ध्वनिक्षेपकासंबंधी नियमांचे उल्लंघन झाल्यास पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ तसेच ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम २००० अंतर्गत कारवाई होऊ शकते. यामध्ये दंड, साहित्य जप्ती तसेच पुढील प्रचारावर निर्बंध घालण्यासारख्या कारवायांचा समावेश आहे. गंभीर प्रकरणांमध्ये उमेदवारीवरही परिणाम होऊ शकतो, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, शांततापूर्ण व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी पोलिस प्रशासन व निवडणूक विभाग सतर्क असून शहरभर पथके तैनात करण्यात आली आहेत. त्यामुळे उमेदवारांनी प्रचार करताना नियमांचे काटेकोर पालन करावे, नागरिकांच्या शांततेचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी केले आहे. नियम पाळल्यासच प्रचार सुरक्षित व कायदेशीर राहील, अन्यथा निष्काळजीपणा उमेदवारांना महागात पडू शकतो.

# भाजपच्या नाराज उमेदवारांची बच्चू कडू यांच्याकडे धाव

### शक्ति महाराज - बच्चू कडू यांच्यात एक तास चर्चा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

अमरावती महानगरपालिकेतील जागा वाटपावरून भाजपमध्ये असंतोष उफाळून आला असून भाजपचे तिकीट नाकारण्यात आलेले इच्छुक उमेदवार आता प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष आमदार बच्चू कडू यांच्या भेटीला जात असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. भाजपमध्ये नाराज असलेले उमेदवार आणि कार्यकर्ते पर्यायी राजकीय भूमिका ठरवण्यासाठी बच्चू कडू यांच्याशी चर्चा करत असल्याची माहिती आहे.महानगरपालिकेतील जागा वाटपावरून संतप्त झालेले शक्ति महाराज यांनी काल भाजपचे नेते शिवराय कुलकर्णी, जयंत डेहनकर आणि दिनेश सूर्यवंशी यांना जाहीरपणे घेरत तीव्र शब्दांत जाब विचारला होता. निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलून काही मोजक्यांनाच तिकीट देण्यात आल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला होता. या घटनेनंतर भाजपमधील अंतर्गत नाराजी अधिक तीव्र झाली आहे.भाजपकडून तिकीट नाकारण्यात आलेल्या इच्छुक उमेदवारांनी आज बच्चू कडू यांची भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. या भेटीत आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुढील रणनीती, संभाव्य राजकीय आघाड्या आणि निवडणूक लढवण्याबाबत चर्चा झाल्याचे समजते.या घडामोडींमुळे अमरावतीतील भाजपची डोकेदुखी वाढली असून, येत्या काही दिवसांत आणखी नाराज नेते व कार्यकर्ते बच्चू कडू यांच्या संपर्कात येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे १६ शिलेदार मैदानात

### मित्र पक्षांकडून १६ उमेदवारांना संधी; एकूण ३२ उमेदवार रिंगणात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

अमरावती महानगरपालिका निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार व मित्रपक्षाकडूनिवडणुकीच्या रिंगणात एकूण ३२ उमेदवार उतरले आहे. त्यापैकी १६ उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून तर १६ उमेदवार मित्र पक्षाकडून निवडणूक रिंगणात उभे आहेत.राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातर्फे अमरावती महानगरपालिका निवडणुकीसाठी जाहीर करण्यात आलेल्या उमेदवारांमध्ये प्रभाग क्रमांक एक गजानन किसनराव राऊत( ड ),प्रभाग क्रमांक तीन आसिफ खान रशीद खान(ड),प्रभाग क्रमांक चार शाहिदा बानो सय्यद महसूद(क), प्रभाग क्रमांक आठ नितीन नथुजी राऊत (ड),प्रभात क्रमांक नऊ तेजश्री संजय वानखडे (अ), प्रभाग क्रमांक दहा राहुल लक्ष्मणराव मोहोड (ड ),प्रभाग क्रमांक ११ संजीवनी प्रफुल्ल डोंगरे (अ),प्रभाग क्रमांक १२ राजेंद्र देविदास माहुरे( अ ),प्रभाग क्रमांक १३ विशाल लक्ष्मणराव बोरखडे( ड),अर्चना लक्ष्मीनारायण यादव (ब) तर प्रभाग क्रमांक १६ मधून अरबाज खान समी खान( क )व शेख फारुक शेख अहमद (ड),प्रभाग क्रमांक १७ मधून माधुरी विलासराव काळसरपे( क )व दिलीप जानरावजी वऱ्हाडे (ड), प्रभाग क्रमांक १८ मधून भावना राहुल उरकुडे( क) आणि प्रभाग क्रमांक



२० मधून कृतिका रोशन कडू (क )यांना अधिकृत उमेदवारी देण्यात आली आहे.या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी यांनी ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक भारतीय, कम्युनिस्ट पक्ष, रिपाई गवई गट तसेच समाजवादी पार्टी यांच्यासोबत आघाडी केली आहे. त्यामुळे मनपा निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि मित्र पक्षातर्फे जाहीर करण्यात आलेल्या उमेदवारांनी विरोधकांसमोर तगडे आव्हान उभे केले आहे. या निवडणुकीमध्ये ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक तर्फे प्रभाग क्रमांक तीन नवसारी येथून डॉ महाफुज खालीद (ब ),जयश्रीताई कुबडे( क )आणि ड.शुमाईल खान(ड),प्रभाग क्रमांक पाच मधून गोपाल मिलिंद ढेकेकर(अ), प्रभाग क्रमांक दहा मधून भारती सुरेंद्र गुडधे(अ), प्रभाग क्रमांक १२ मधून धर्मराज इत्तूजी सारवान( अ )तर प्रभाग क्रमांक १९ मधून रामकृष्ण अडकुजी महाजन (ड) यांना उमेदवारी दिली आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्षातर्फे प्रभाग क्रमांक १० मधून प्रतिभा दिनेश मेश्राम (अ),संतोष बळीराम राऊत (क)आणि प्रभाग क्रमांक १७ मधून गणेश रामभाऊ भगत (ड )यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तसेच रिपाई गवई गटाकडून प्रभाग क्रमांक दोन दिनेश धाकडे (ड),नरेंद्र गुळदेकर(अ), प्रभाग क्रमांक तीन मधून रचना मकेश्वर(अ), प्रभाग क्रमांक सहा मधून संजय बाळकृष्ण भोवते (ड) आणि प्रभाग क्रमांक १९ मधून सुमन सूर्यवंशी (क) यांना उमेदवारी देण्यात आली आहे. यासोबतच समाजवादी पार्टीतर्फे प्रभाग क्रमांक चार मधून रिजवान अहमद अब्दुल फाईम (ब), अजाज अहमद अब्दुल रझाक (अ), प्रभाग क्रमांक आठ मधून राजन बचेल ( ब ),प्रभाग क्रमांक १५ मधून शकीला बी मोहम्मद खान(क), प्रभाग क्रमांक २१ मधून अब्दुल आतिफ अब्दुल रफिक(ब) व आणि तन्वीर अहमद खान नसीम खान(क) यांना उमेदवारी देण्यात आली आहे.या सर्व उमेदवारांना पक्षातर्फे अधिकृत उमेदवारी देण्यात आल्याचे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार व मित्र पक्षाच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे. अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, डॉ. राजेंद्र गवई, बाळासाहेब कोराटे, सुनील घटाळे व ड.जिया खान यांनी दिली आहे.

# अंजनगांव सुर्जी नगरपरिषदेचा नवनिर्वाचित नगराध्यक्षांनी स्विकारला पदभार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव सुर्जी नगर परिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष ईजि अविनाश गायगोले यांनी आज गुरुवार नववर्षाच्या दिवसांत अधिकृतपणे पदभार स्वीकारला. यानिमित्ताने आयोजित पदग्रहण व सत्कार सोहळा नगरपरिषद सभागृहात उत्साहात पार पडला. यावेळी नवनिर्वाचित नगरसेवक व नगरसेविकांचा जाहीर सत्कार करण्यात आला.मंचावर माजी नगराध्यक्ष यॅड कमलकांत लाडोळे मुकूंद संगई नवनिर्वाचित नगराध्यक्ष ईजि अविनाश गायगोले सह,नवनिर्वाचित नगरसेवक आदी प्रामुख्याने उपस्थित होते.नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांनी आपल्या पहिल्याच भाषणात शहराच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. नगराध्यक्ष पद हे सन्मानासोबतच मोठी जबाबदारी आहे. नागरिकांनी दाखवलेल्या विश्वासाचे ऋण फेडण्यासाठी प्रामाणिकपणे काम करेन. मागील चार वर्षांत निर्माण झालेल्या समस्या सोडविण्यावर भर देत अंजनगाव सुर्जी शहर स्वच्छ, सुंदर व विकासाभिमुख करण्यासाठी सर्वांच्या सहकार्याने काम करणार, असे त्यांनी नमूद केले.कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या माजी नगराध्यक्ष यॅड कमलकांत लाडोळे यांनी




मार्गदर्शन करताना सांगितले की, अजनगाव नगर परिषदेमध्ये मागिल कार्यकाळात भरपूर विकास कामे झाली आहे तर शहरांची झपाट्याने वाढ होत असल्याने नविन वस्तीत कामे या कार्यकाळ होतील कारण केंद्रात व राज्यात सरकार असल्याने निधीची कमतरता भासणार नसून मतदारांनी भाजप पक्षावर विश्वास टाकून पक्षाच्या नगराध्यक्षांना निवडून दिले आहे. अविनाश गायगोले यांनी भाषणात सत्ताधारी-विरोधी असा कोणताही भेद न करता सर्व नगरसेवकांना सोबत घेऊन शहराच्या सर्व प्रभागांतील प्रलंबित प्रश्न मार्गी लावले जातील.नगराध्यक्ष पदाबाबत बोलताना त्यांनी हे पद म्हणजे काटेरी मुकुट असून त्यासाठी धैर्याने आणि प्रामाणिकपणे काम करावे लागेल. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस विकास आराखडा तयार करून राज्य व केंद्र सरकार कडून निधी आणण्यात येईल , अशी ग्वाही नवनिर्वाचित नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांनी आपल्या भाषणात केली.कार्यक्रमात नवनिर्वाचित नगराध्यक्षा, नगरसेवक व नगरसेविकांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुरकुटे सर यांनी केले तर आभारप्रदर्शन नवनिर्वाचित नगरसेविका प्रियंका मालठाणे यांनी केले. या सोहळ्यास भाजप व काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शहरातील प्रतिष्ठित नागरिक, नगर परिषदेचे अधिकारी-कर्मचारी तसेच महिला-पुरुष नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**पदग्रहणाला शिवसेना उबाठा सदस्यांची अनुपस्थिती**

अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेच्या निवडणुकीत शिवसेना उबाठा पक्षाचे सात नगरसेवक निवडून आले मात्र नगराध्यक्ष पदाच्या पदग्रहणाला अनुपस्थित होते तर काँग्रेस शिवसेना शिंदे समाजवादी पक्षासह अपक्ष नगरसेवक या सोहळ्यात उपस्थित होते.

# शिक्षक संघातर्फे नवनिर्वाचित नगराध्यक्षांचा सत्कार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अचलपूर**

महाराष्ट्र राज्य नपा व मनपा शिक्षक संघ (अर्जुन कोळी) यांच्या नेतृत्वाखालील अमरावती जिल्हा संघटनेतर्फे बुधवारी अचलपूरच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. रुपाली अभय माथने यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला.यावेळी नगराध्यक्षा रुपाली माथने यांनी शिक्षकांचे वैयक्तिक तसेच सामूहिक प्रश्न सोडविण्यासाठी आपण सदैव कटिबद्ध राहू, तसेच त्यांच्या समस्या तात्काळ मार्गी लावण्यासाठी प्रयत्नशील राहू, असे आश्वासन शिक्षक संघटनेला दिले.या सत्कारप्रसंगी शिक्षक संघटनेचे विविध पदाधिकारी उपस्थित होते. यामध्ये शमुकेश चव्हाण (जिल्हाध्यक्ष तथा कोर कमिटी सदस्य), भास्कर कडू (राज्य कार्यकारणी सदस्य), विशाल यादव (राज्य कार्यकारणी सदस्य), कैलास गजबे (जिल्हा सदस्य), सौ. ममता आखूड (महिला आघाडी प्रमुख), अशोक कपाटे (तालुका अध्यक्ष), शेख जमील शेख जहूर (जिल्हा सदस्य), सौ. कल्पना राठोड (सदस्य) यांच्यासह जिल्ह्यातील इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमातून शिक्षक संघटना व नगरपालिकेतील नव्या नेतृत्वामधील सकारात्मक समन्वय अधिक दृढ होईल, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
विदर्भ प्रजासत्ताक
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत